# प्रकरण पहिले

## रिपब्लिकन पक्षाचा उदय व पार्श्वभूमी

## प्रकरण पहिले

### रिपब्लिकन पक्षाचा उदय व पार्श्वभूमी

हिंदुस्थानात चातुवर्ण्याची व अस्पृश्यता पध्दत फार पूर्वीपासून चालत आलेली होती. चातुवर्ण्याची पध्दत कशी निर्माण झाली ? अस्पृश्यतेचा उगम कधी झाला ? याबाबतीत अगदी ठामपणे सांगणे अशक्य आहे व याला कोणताही ऐतिहासिक पुरावा मिळत नाही. प्राचीन काळी मनु नामक व्यक्तिने हिंदूंचा आचार धर्म सांगणारा ग्रंथ लिहिला. या ग्रंथाला "मनुस्मृती" असे म्हणतात. मनुस्मृती हा हिंदू धार्मियांचा पवित्र ग्रंथ मानला जात असे. मनुस्मृतीच्या पहिल्या अध्यायातील ३१ व्या श्लोकात शूद्रांची उत्पत्ती कशी झाली याचा उल्लेख आढळतो. तसेच चातुर्वण्याची उत्पत्ती ॠग्वेदातील पुरुष सुक्तात दिलेली आहे. (मंडळ १० ॠचा ९०) "ब्राम्हणांचा जन्म ब्रम्हदेवाच्या मुखापासून झाला म्हणून ते समाजात श्रेष्ठतम् होत. क्षत्रियांचा जन्म ब्रम्हदेवाच्या बाहुपासून झाला म्हणून ते ब्राम्हणांच्या खालच्या दर्जाचे होत. वैश्याचा जन्म ब्रम्हदेवाच्या मांडीपासून झाल्याने ते ब्राम्हण व क्षत्रिय यांच्यापेक्षा कमी दर्जाचे होत व शूद्रांचा जन्म ब्रम्हदेवाच्या पायापासून झाल्याने ते सर्वापेक्षा निचतम दर्जाचे आहेत." [१]

असे शूद्रांना नीच ठरविणारे उल्लेख हिंदू धर्माच्या निरनिराळ्या ग्रंथात आढळतात. परंतु या ग्रंथाचा कालखंड कोणता आहे ? हे निश्चित ठरविता येत नाही. हिंदुस्थानातील लोकवृध्दी प्रामाण्यापेक्षा ग्रंथ प्रामाण्याला अधिक महत्व देत असल्याने या ग्रंथाच्या आधारे त्यांना मानून समाजातील व्यवहार चालत असत. यामुळे अस्पृश्य व शूद्र लोकांची परिस्थिती फारच बिकट झाली होती. त्यांना पशूपेक्षाही हीन मानल्यामुळे व धर्मग्रंथात

त्यांना खालचा दर्जा दिल्याने त्यांची परिस्थिती हालाखीची बनलेली होती. व त्यांना समाजात इतर जाती व वर्णाप्रमाणे कोणतेही हक्क मिळालेले नव्हते.

मध्ययुगीन महाराष्ट्रात जी संत परंपरा निर्माण झाली त्यावेळी नामदेव, तुकाराम, ज्ञानेश्वर इत्यादी संतांनी भावनिक व आध्यात्मिक पातळीवरुन अस्पृश्यता नष्ट करण्याचा प्रयत्न केला होता. परंतु यामुळे अस्पृश्यांची परिस्थिती सुधारु शकली नाही. पेशवाईच्या काळात अस्पृश्यता व चातुर्वर्ण्याची पध्दत फार मोठया प्रमाणावर दृढ होऊ लागली. यामुळे अस्पृश्यांना रस्त्यावर फिरणे देखील अशक्य झाले होते.

इंग्रजांच्या आगमनानंतर ब्रिटिशांनी भारतात आधुनिक शिक्षणाचा प्रारंभ केला. सन १८७३ च्या सनदी कायद्यानुसार ईस्ट इंडिया कंपनीने भारतीयांच्या शिक्षणासाठी दरवर्षी एक लाख रुपये खर्च करावेत असे बंधन घालण्यात आले.[२] म्हणून इंग्रज व मिशनरी यांच्या प्रयत्नामुळे समाजात नवी जागृती आली. त्यांच्या प्रयत्नामुळे हिंदुस्थानात पहिली सुशिक्षित पिढी निर्माण झाली. त्यांना आद्य समाज सुधारक असे म्हटले जाते. त्यामध्ये भाऊ दाजी लाड, आचार्य बाळशास्त्री जांभेकर, गोपाळ हरी देशमुख, विष्णुशास्त्री पंडित, दादोबा तर्खडकर, म.गो. रानडे, डॉ. भांडारकर, जगन्नाथ शंकरशेठ इत्यादी सुशिक्षित सुधारकांच्या पहिल्या पिढीने हिंदू धर्मावर टीका करुन या धर्मातील दोष दूर करण्याचा प्रयत्न केला व नियतकालिके निबंध, ग्रंथलेखन करुन जातीभेद नष्ट होण्यासाठी प्रबोधन केले. त्यानंतर राजाराम मोहन रॉय, आगरकर इत्यादी समाजसुधारकांनी निरनिराळया धार्मिक व सामाजिक संघटना निर्माण करुन सामाजिक सुधारणांचा प्रयत्न केला. यामध्ये सतीची चाल बंद, विधवा विवाह, पुनर्विवाह, बालविवाह प्रतिबंधक कायदा, स्त्री शिक्षण इ. सुधारणांचा समावेश होतो.

अर्थातच हे वरील सर्व समाज सुधारक उच्च वर्गातून पुढे आलेले होते व त्यांनी समाज सुधारणा करण्याचा प्रयत्न केला होता. परंतु ख-या अर्थाने बहुजन समाजासाठी व अस्पृश्यासाठी कार्य करणारे गोपाळ बाबा वलंगकर ही अस्पृश्य समाजातील पहिली व्यक्ती होती. गोपाळ बाबा वलंगकर या अस्पृश्य व्यक्तीने १८९० साली "अनार्य दोषपरिहार मंडळी" नावाची संस्था सुरु केली. ते या संस्थेचे जनक व सचिव होते. संख्यात्मकता आपल्या कार्याला दिशा देऊ शकेल असा त्यांचा आत्मविश्वास होता. बहि:ष्कृत व पीडित समाजाला संघटित करण्याचा अस्पृश्य माणसाने केलेला हा पहिला प्रयत्न होता. [3]त्यांनी "विटाळ विध्वंसक" व "हिंदूधर्म दर्पणा" नावाची पुस्तिका लिहिली व वृत्त-पत्रातून लेख लिहिले व तत्कालीन समाज व्यवस्थेवर त्यांनी टीका केली होती व अस्पृश्य सुधारणा करण्याचा प्रयत्न केला होता.

याच कालखंडात बहुजन समाजाला व अस्पृश्यांना नव संजीवनी देण्याचे महत्त्वाचे कार्य महात्मा जोतिबा फुले यांनी केले आहे. त्यांचा जन्म मध्ये झाला. या समाजसुधारकाने बहुजन समाजाला संघटित करण्यासाठी व त्यांच्यात सुधारणा घडवून आणण्यासाठी २४ सप्टेंबर १८७३ रोजी सत्यशोधक समाजाची स्थापना केली. या संस्थेचे ध्येय पुढील प्रमाणे होते. "शूद्र आणि अतिशूद्र यांची ब्राह्मण पुरोहिताकडून होणारी पिळवणूक बंद करणे, त्यांना त्यांच्या मानवी हक्कांची अन् अधिकारांची शिकवण देणे आणि ब्राह्मणी शास्त्राच्या मानसिक आणि धार्मिक गुलामगिरीतून त्यांना मुक्त करणे हे ध्येय स्वीकारुन त्यांनी या संस्थेची स्थापना केली होती. [४]

सत्यशोधक समाजाची स्थापना म्हणजे समाजसुधारणा करण्यासाठी निर्माण केलेली ही पहिली चळवळ होती. या संस्थेची प्रमुख तीन तत्वे होती.

पहिले तत्व सर्व माणसे एकाच परमेश्वराची लेकरे आहेत व परमेश्वर त्यांचा आई - बाप आहे. तर दुसरे तत्व आईला भेटण्यास आर बापाला प्रसन्न करण्यास ज्याप्रमाणे मध्यस्थांची जरुरी नसते त्याचप्रमाणे परमेश्वराची प्रार्थना करण्यास पुरोहिताची आवश्यकता नसते. आणि तिरे तत्व म्हणजे वरील तत्व कबूल असणा-यांस या संस्थेचे सदस्य होता येईल. [५] यासत्यशोधक समाजाच्या पहिल्या तत्वानुसार सर्व लोक समान आहेत व ते सर्व एकाच परमेश्वराची उत्पत्ती असल्याने ते एकमेकांचे बंधू आहेत असा व्यापक अर्थ पहिल्या तत्वाने स्पष्ट होतो. दुस-या तत्वानुसार धार्मिक कार्यात होणारी मध्यस्थी व त्यामुळे बहुजन समाजाची होणारी पिळवणूक यावर नियंत्रण घालण्यासाठी हे तत्व निर्माण केले होते. ही दोन्ही तत्वे मान्य असणा-यांनाच या समाजाचे सदस्य होता येत असे.

या सत्यशोधक समाजाने संपूर्ण महाराष्ट्रातल्या काना-कोप-यात जाऊन समाजात जागृती केली. सत्यशोधक जलसे व तमाशे यांनी जागृतीच्या कार्यात मोलाची कामगिरी बजावली. हुंडा घेऊ नये, कर्ज काढून समारंभ साजरे करु नयेत. साध्या पध्दतीने लग्ने करावीत व जीवनातील सर्वच क्षेत्रात ब्राह्मणांची असलेली मक्तेदारी मोडून काढावी यासाठी सत्यशोधक समाजाने प्रयत्न केला.

त्यानंतर महात्मा फुले यांनी पुण्यात १८४८ मध्ये मुलींच्यासाठी एक शाळा सुरु केली होती. त्याच बरोबर त्यांनी "अतिशुद्रांच्या शिक्षणाकडे आपले लक्ष केंद्रित केले. इ.स. १८५२ मध्ये अस्पृश्यांसाठी वेताळपेठेत स्वखर्चाने एक शाळा सुरु केली. इ.स. १८५३ साली आपल्या कांही होतकरु मित्रांच्या सहाय्याने "महार मांग इत्यादी लोकास विद्या शिकविण्याकरिता मंडळी" या नावाची संस्था काढली. [६] याचबरोबर बहुजन समाजाच्या जागृतीसाठी त्यांनी

"गुलामगिरी", "ब्राम्हणांचे कसब", "शेतक-यांचा आसुड", "सार्वजनिक सत्यधर्म", इत्यादी ग्रंथ लेखन केले. त्यांच्या विविध क्षेत्रातील कार्यामुळे महात्मा जोतीबा फुले हे महाराष्ट्रातील पहिले क्रांतिकारक ठरले. या शिवाय त्यांना हिंदुस्थानचे मार्टिन ल्यूथर किंग असेही म्हटले जाते. त्यांच्या-बद्दल "तर्कतीर्थ लक्ष्मण शास्त्री जोशी म्हणतात, "हिंदू समाजातील बहुजन समाजात आत्मप्रत्यय व आत्मावलोकन उत्पन्न करणारा पहिला माणूस म्हणजे फुले होय." [७] त्यांच्या या उद्गारावरुन महात्मा फुले यांच्या कार्याची थोरवी समजून येते.

परंतु २७ नोव्हेंबर १८९० रोजी महात्मा फुले यांचा मृत्यू झाल्याने अस्पृश्यांचा व्यापक प्रश्न काही काळ बाजुला पडलेला होता. अस्पृश्य समाजात जागृती करण्यासाठी त्याना त्यांच्या हक्कांची जाणीव करुन देऊन त्यांच्यात प्रगती करण्यासाठी महात्मा फुले यांच्यानंतर अस्पृश्यांत सर्वांगीण प्रगती घडवून आणणारा समाज सुधारक म्हणून कर्मवीर विठ्ठल रामजी शिंदे यांनी प्रयत्न सुरु केले. कर्मवीर शिंदे यांनी १९०३-१९०४ साली अस्पृश्यांच्या प्रश्नाचा विचार करण्यास सुरुवात केली. १९०६ साली अस्पृश्यांसाठी स्वतंत्र "भारतीय निराश्रीत सहकारी मंडळ" ही संस्था स्थापन केली. ते स्वतः अस्पृश्यांच्या वस्तीतच आपल्या मुलाबाळांसह, बायकोसह जाऊन राहिले व सर्व आयुष्य याच कार्याला समर्पित केले. [८]

१९१७ साली कलकत्ता येथे कॉंग्रेसचे वार्षिक अधिवेशन होते. ॲनी बेझंट या वर्षी अधिवेशनाच्या अध्यक्षा होत्या. त्यांच्या मार्फत कर्मवीर शिंदे यांनी भारतीय अस्पृश्यता नष्ट करण्यासाठी कॉंग्रेसने प्रयत्न केला पाहिजे. असा ठराव पास करुन घेतला. त्यापूर्वी ८-१० वर्षे कर्मवीर शिंदे यांनी असा ठराव कॉंग्रेस अधिवेशनात कॉंग्रेसच्या व्यासपीठावरुन पास करुन घेण्याचा प्रयत्न

केला होता. परंतु प्रत्येक वेळी त्यांचा प्रयत्न अयशस्वी ठरला. १९१७ साली मात्र त्यांचे १० वर्षांचे परिश्रम फलदायी ठरले. राष्ट्रीय काँग्रेस या ठरावामुळे राजकीय सुधारणे बरोबर सामाजिक सुधारणेला देखील बांधली गेली.[९]

नंतरच्या कालखंडात कर्मवीर शिंदे यांनी काँग्रेसच्या माध्यमातून अस्पृश्यतेचा व्यापक प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न केला होता. "डिप्रेस्ड क्लासेस मिशन" नावाची संस्था निर्माण करुन त्यांची संघटना बांधण्याचा प्रयत्न कर्मवीरांनी केलेला दिसतो. त्यांच्या कार्यापूर्वी अस्पृश्यता निवारण्याचे प्रयत्न झालेले होते. (गोपाळबाबा वलंगकर, महात्मा जोतीबा फुले यांच्या नंतर व्यापक प्रयत्न करुन अस्पृश्यांत जागृती निर्माण करणारे समाज सुधारक म्हणून कर्मवीर शिंदे यांना ओळखले जाते.)

महात्मा जोतीबा फुले, शिंदे यांच्या कार्यापासून प्रेरणा घेऊन कोल्हापूर संस्थानात छत्रपती शाहू महाराजांनी अस्पृश्यांच्या क्षेत्रात भरीव स्वरुपाचे कार्य केले आहे. त्यांच्या कार्यामुळे त्यांना लोकांचा राजा ही पदवी प्राप्त झाली होती. त्यानी आपल्या राजसत्तेचा उपयोग दलित-भटके, आदिवासी यांच्या विकासासाठी केला आहे. त्यांना समाजात चांगल्या पध्दतीने राहता यावे, त्यांच्या अनिष्ट प्रथा बंद व्हाव्यात यासाठी स्वत: युक्तिने व कृतीने प्रयत्न केले. त्यांनी अनेक पुरोगामी स्वरुपाचे कायदे आपल्या संस्थानात करुन त्या कायद्यांची काटेकोरपणे अंमलबजावणी केली. त्यामुळे सयाजीराव गायकवाड व छत्रपती शाहू महाराज हे दोनच असे संस्थानिक होते की, त्यांनी मोठया प्रमाणावर समाजसुधारणा केल्या. राजर्षी शाहू महाराजांच्या मते वतनदारी आणि इनामदारी ही प्रगतीच्या पायातील धोंड आहे." तिचा काटा शाहू महाराजानी प्रथम काढला. १९१८ साली

वतनदारी नाहिशी करण्याचा कायदा त्यांनी पास केला. त्यातच शाहू महाराजांनी महारांची वतने नष्ट करुन वतनदार, गाव कामगार महार हा सरकारी गाळकीच्या व रोजच्या गुलामी कामातून मुक्त केला. त्यांनी ख-या अर्थाने क्रांतीकार्याची मुहूर्तमेढ रोवली. महारांची वतने रद्द करुन त्यांच्या जमिनी रयतावा करुन इतर शेतक-यांच्या पातळीवर महार वर्गाला आणले. त्यांच्याकडून सक्तीने काम करुन घेण्यास बंदी करण्यात आली. २५ जून १९१८ रोजी त्यांनी फर्मान काढले. ३ मार्च, १९१९ च्या नव्या हुकूमाने बलुतेदार पद्दतीलाही आळा घातला. अस्पृश्यांची वेठबिगार कायद्याने बंद केली. सार्वजनिक विहिरी, तळी, पाण्याचे नळ, धर्मशाळा, दवाखाने, शाळा व कचे-या या ठिकाणी अस्पृश्य वर्गाला वापरण्याचे व उपभोग घेण्याचे समान हक्क दिले.[१०]

या हक्का बरोबरच अस्पृश्यांच्या विद्यार्थ्यांसाठी त्यांनी १९०८ साली "मिस क्लार्क" नावाचे वसतिगृह सुरु केले. अस्पृश्यांना निरनिराळ्या प्रकारच्या नोक-या दिल्या. पट्टेवाले, शिपाई, डागलेवाले, माहूत, कोचमन, ड्रायव्हर इत्यादी नोक-या देऊन महाराजांनी अस्पृश्याना आपल्या संस्थानात नेमले, एवढेच नव्हे तर, त्यांनी आपल्या संस्थानात अस्पृश्यासाठी ५० टक्के राखीव जागा ठेवल्या होत्या. त्याकाळी शाहू महाराजांना प्रचंड विरोध सहन करावा लागला होता. परंतु शाहू महाराज म्हणाले होते की, "दलितांच्या सेवेसाठी मला छत्रपतीचे सिंहासन सोडावे लागले तरी पर्वा नाही."[११] त्यांच्या या उद्गारावरुन त्यांना अस्पृश्यता नाहीशी करण्याची किती तळमळ होती हे जाणवते. शाहूंनी अस्पृश्यता नष्ट करण्यासाठी आपल्या संस्थानात अनेक अभिनव प्रयोग केले. भास्कर गंगाराम कांबळे या अस्पृश्य व्यक्तिला त्यांनी सर्वप्रथम हॉटेल काढण्यासाठी सहाय्य करुन ते स्वत: त्या हॉटेलात दररोज जाऊन चहा घेऊ लागले. त्यांची ही कृती अस्पृश्यता नष्ट होण्यास सहाय्यभूत ठरली. या शिवाय अस्पृश्यांना सोडा वॉटरचे दुकान, शिलाईचे दुकान, यांच्यासाठी अस्पृश्यांना आर्थिक सहकार्य केले.

अस्पृश्यांना शिक्षण मिळावे यासाठी त्यांनी अनेक कायदे केले. ख-या अर्थाने शाहू महाराज हे क्रांतिकारक समाज सुधारक ठरतात. या प्रकारची अनेक कार्ये करुन पद-दलितांचा उध्दार करत असतानाच शाहू महाराजांच्या प्रेरणेने अनेक अस्पृश्यांतील समाजसुधारक पुढे आले. भास्कर गंगाराम कांबळे, पंजाबराव हुलास्वार, दा.म. शिर्के, गंगाधर यशवंत पोळ, गंगाराम यमाजी कांबळे, प्रभू यल्लाप्पा कांबळे, आबा सुबू गवळी, के. डी.एस्. पवार, के. गणेशाचार्य वकील इत्यादी नेते अस्पृश्यांसाठी कार्य करु लागले. महाराजांनी दिलेल्या प्रोत्साहनामुळे व पाठिंब्यामुळे दत्तोबा पवार यासारखे कार्यकर्ते अस्पृश्य समाजात निर्माण झाले. त्यांनी दत्तोबाची कोल्हापूर नगर पालिकेच्या स्थायी समिती-च्या अध्यक्षपदी नेमणूक केली. ते त्या जागेवर १९२० ते २५ पर्यंत कार्य करीत होते. ते पुढे कर्तबगारीने मामलेदार व कॉंग्रेसचे आमदार झाले. अध्यक्ष पदा-वरील ही नेमणूकीची घटना कोल्हापूर संस्थानात त्याकाळी क्रांतिकारक ठरली.[१२]

असे अनेक क्रांतिकारक प्रयोग शाहू महाराजांनी आपल्या कारकिर्दीत केलेले दिसतात. ते अस्पृश्यांच्या वतीने भरलेल्या नागपूर व बेळगांव परिषदेला उपस्थित राहून त्यांनी अस्पृश्यांना मार्गदर्शनही केले होते.

डॉ. आंबेडकरांचा उदय व त्यांचे सार्वजनिक क्षेत्रातील कार्याला देखील छ. शाहू महाराज हेच कारणीभूत ठरलेले दिसतात. शाहू महाराज व डॉ. बाबासाहेब आंबेडकर याचा परिचय घडून आल्यानंतर शाहू महाराजांच्यानंतर अस्पृस्यांच्यासाठी व्यापक कार्य करणारा नेता अस्पृश्यांना मिळाला. याकाळी वर्तमानपत्रात एक महाराचा पोर अमेरिकेकडून एम्.ए., पीएच्.डी. होऊन आला ही वर्तमान पत्रातील बातमी वाचून शाहू महाराज आश्चर्यचकित झाले. या आंग्लविद्या विभूषित व्यक्तिला पाहण्यासाठी त्यांची आतुरता अधिकच वाढली.[१३] त्यामुळे महाराजांनी आपली माणसे त्यांच्याकडे पाठवून दिली. व नंतर स्वत: शाहू महाराज डॉ. आंबेडकरांना भेटण्यासाठी मुंबईतील परळ

विभागात गेले व तेथे शाहू महाराज व आंबेडकर यांची भेट घडून आली. त्यावेळी शाहू महाराजांनी आंबेडकरांना कोल्हापूर भेटीचे आमंत्रण दिले होते.

त्यामुळे कोल्हापूर संस्थानातील दत्तोबा पोवारानी पुढाकार घेऊन शाहू महाराज व कोल्हापूरातील अस्पृश्यांचे पुढारी डॉ. रमाकांत कांबळे, गंगाराम कांबळे, तुकाराम गणाचारी, शिवराम कांबळे, रामचंद्र कांबळे, निंगाप्पा ऐदाळे, या सर्वांशी चर्चा करून व त्यांच्या गाठी-भेटी घेऊन व त्याच वेळी डॉ. आंबेडकरांशी पत्रव्यवहार करून २० मार्च १९२० या दिवशी, त्यावेळी अस्पृश्य समाजाशी विशेष प्रेमभावना असलेल्या गावकामगार पाटलांच्या कागल जहागिरीतील माणगाव या गावी अस्पृश्यांची पहिली सभा डॉ. आंबेडकरांच्या अध्यक्षतेखाली घेण्याचे ठरले. [१४]

त्यानंतर डॉ. आंबेडकर हे २० मार्च १९२० रोजी माणगाव येथे आले. माणगाव येथे डॉ. आंबेडकरांचे भव्य स्वागतकरण्यात आले होते व त्यांना सभेच्या ठिकाणी सन्मानपूर्वक नेले होते व या सभेचे अध्यक्षपद डॉ. आंबेडकरांना दिले होते. या परिषदेच्या दुसऱ्या दिवशी छत्रपती शाहू महाराज परिषदेसाठी हजर झाले होते व याच परिषदेत शाहूंनी पुढील ऐतिहासिक उद्गार काढले की, "माझी खात्री आहे की, डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे आपल्या समाजाबरोबर देशाचाही उध्दार करतील. एवढेच नव्हे तर एक वेळ अशी येईल की, ते सर्व हिंदुस्थानचे पुढारी होतील. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांसारखा विद्वान महाराष्ट्रात जन्माला आला ही घटना देश हिताच्या दृष्टीने अतिशय महत्त्वाची आहे." [१५]

शाहू महाराजांचे हे उद्गार म्हणजे डॉ. आंबेडकरांच्या कार्याची ही नांदी ठरली. डॉ. आंबेडकरांना उद्देशून शाहू महाराज म्हणाले की, "आता

तुम्हीच इथून पुढे दलितांच्या कार्यासाठी कार्य सुरु करा." शाहू महाराजांच्या या उद्गारातून प्रेरणा मिळाली व ते अस्पृश्यांच्या प्रश्नावर व्यापक तोडगा काढण्यासाठी, त्यांना आर्थिक, सामाजिक व राजकिय अशा सर्वच क्षेत्रात हक्क मिळवून देण्यासाठी त्यांनी संघटितरित्या प्रयत्न करण्यास सुरवात केली.

त्यामुळे ९ मार्च, १९२४ रोजी दलित वर्गीयांच्या प्रश्नाचा विचार करण्यासाठी आंबेडकर यांनी मुंबईतील परळच्या दामोदर हॉलमध्ये एक सभा बोलवली होती. त्या सभेत जी चर्चा झाली व जो विचारविनिमय झाला त्यावरुन २० जुलै, १९२४ रोजी "बहिष्कृत हितकारिणी सभा" ही संस्था स्थापन करण्यात आली. सर चिमणलाल सटेलवाड हे अध्यक्ष व डॉ.आंबेडकर हे व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष झाले. रँग्लर र.पु. परांजपे, जी.के. नरिमन व बाळ गंगाधर खेर (मुंबईचे माजी मुख्यमंत्री) अशी काही ठळक मंडळी या व्यवस्थापन समितीत होती. अस्पृश्यामध्ये शिक्षणाचा प्रसार करणे, त्यांच्या आर्थिक परिस्थितीत सुधारणा घडवून आणणे तसेच गाऱ्हाण्यांची दाद लावून घेणे अशी तातडतोबीची उद्दिष्टे या सभेने घोषित केली होती. [१६]

संस्थेच्या कामकाजाला सुरवात झाल्यानंतर सुरवातीच्या तीन वर्षाच्या काळात सामाजिक जागृतीवर अधिक भर दिला होता. या संघटनेचे पहिले अधिवेशन कुलाबा जिल्ह्यातील महाड येथे भरविण्यात आले होते. या अधिवेशनाच्या शेवटच्या दिवशी चवदार तळ्याचे पाणी प्राशन करुन समतेच्या हक्कासाठी संघर्षाची सुरवात करण्याचा एक महत्वपूर्ण ठराव करण्यात आला. व डॉ. आंबेडकरांच्या नेतृत्वाखाली सत्याग्रह करण्याचे निश्चित करण्यात आले. [१७]

या ठरावानुसार सत्याग्रहाला प्रत्यक्षात सुरवात झाली. याच परिषदेच्या वेळी बाबासाहेबांनी मनुस्मृतीचे दहन करुन आपल्या सर्वकष संघर्षाचो

मुहूर्तमेढ रोवली. हा सत्याग्रह कालांतराने यशस्वी करण्यात आला व या मार्गाने सामाजिक समता प्रस्थापित करण्याचा पहिला प्रयत्न करण्यात आला होता. हिंदू लोकांच्या भावनेला आवाहन करुन त्यांनी दलितांच्या न्याय्य हक्काला मान्यता द्यावी म्हणून मंदिर प्रवेशाचा त्यांनी दुसरा सत्याग्रह हाती घेतला. नाशिक येथील "काळाराम मंदिर प्रवेश करणार आहोत. पण मंदिर प्रवेशाने तुमचे सर्वच प्रश्न सुटतील असे नाही. आपल्या प्रश्नांचे स्वरुप व्यापक आहे. राजकीय, सामाजिक, आर्थिक, धार्मिक आणि शैक्षणिक आहे. पण आजचा हा काळाराम मंदिर प्रवेश हा उच्चवर्णीय हिंदू मनास एक प्रकारचे आवाहन आहे. शेकडो वर्षे उच्चवर्णीय हिंदूंनी आम्हाला माणूसकीच्या हक्कापासून दूर ठेवले तेच हिंदू आज आपल्याला माणुसकीचे अधिकार देण्यास तयार आहेत की नाहीत हा एकच प्रश्न या सत्याग्रहातून निर्माण होणार आहे. आणि म्हणून तो यशस्वी होणे अथवा न होणे हे हिंदूंच्या मनोरचनेवर अवलंबून आहे. माणसाला माणूस म्हणून वागवावे माणुसकीचे अधिकार द्यावेत आणि मानवतेची प्रतिष्ठापना करावी या नवयुगातील प्रेरणा हिंदू मन मानण्यास तयार आहे किंवा नाही याची कसोटी या सत्याग्रहाने लागणार आहे". असे उद्गार काढले होते. [१८]

सामाजिक समता प्राप्त करुन घेण्यासाठी डॉ. आंबेडकरांच्या नेतृत्वाखाली हे दोन सत्याग्रह करण्यात आले. हिंदू मनाला आवाहन करुन त्यांनी समता प्रस्थापित करण्याचा प्रयत्न केला. "बहिष्कृत हितकारिणी सभा" या संस्थेच्या माध्यमातून हे सत्याग्रहाचे प्रयोग आंबेडकरांनी यशस्वी केले. जवळ-जवळ तीन वर्षे या संघटनेच्या माध्यमातून डॉ. आंबेडकरांनी सामाजिक चळवळी केल्या. परंतु या चळवळीमुळे अस्पृश्यांचे प्रश्न व समस्या सोडविण्यास मदत झाली नाही. उलट हिंदू व अस्पृश्य यांच्यातील संघर्ष वाढतच राहिला होता. सामुदायिक सत्याग्रहाचे हे प्रयोग म्हणजे आपल्या हक्कासाठी अस्पृश्य वर्गाने केलेले हे संघटनात्मक बंडच होते अशा कार्यक्रमाने हिंदू समाजाला मोठे हादरे बसले.

विचारवंत, पुरोगामी सुधारक हिंदूनी या कार्यक्रमाबद्दल सहानुभूती दाखविली एवढेच नव्हे तर अस्पृश्यांच्या बरोबर ते सत्याग्रहात सामिल झाले होते व डॉ. आंबेडकरांच्या कार्याला सहकार्य केले होते.

बहि:ष्कृत हितकारिणी सभेमार्फत अस्पृश्य विद्यार्थ्यांसाठी शिक्षणाची सोय व्हावी म्हणून ठिकठिकाणी मोफत वसतिगृहे स्थापन केली. तसेच सामाजिक दृष्टीने अत्यंत खालच्या थरावर असलेल्या अस्पृश्य समाजातील लोकांच्या मनात स्वाभिमान उत्पन्न केला. आपणही माणसे आहोत, माणसाप्रमाणे जगण्याचा हक्क आपणासही आहे आपण इतरापेक्षा कोणत्याही प्रकारे कमी नाही. अशा प्रकारची जाणीव करून द्यायला त्यांनी सुरवात केली. बहिष्कृत हितकारणी सभेचे घोषवाक्य होते, "शिका, संघटित व्हा व संघर्ष करा" आणि या विचाराप्रमाणे बाबासाहेब समाजात जागृती निर्माण करत होते. [१९]

अस्पृश्यांनी स्वच्छ रहावे, त्यांनी आपल्या मुलांना चांगल्या प्रकारचे शिक्षण द्यावे. अस्पृश्यांनी गावकीची कामे सोडून द्यावीत असा संदेश आंबेडकर अस्पृश्यांना देत होते. या कालखंडात ब्रिटिश सरकार हिंदुस्थानात राज्य करत होते. ब्रिटिश सरकारने १९२८ साली भारतीय राजकारणाचा मागोवा घेण्यासाठी सर जॉन सायमन यांच्या नेतृत्वाखाली एक कमिशन भारतात पाठविले होते. हे कमिशन ३ फेब्रुवारी १९२८ ला भारतात आले. कॉंग्रेस पक्षाने या कमिशनवर बहिष्कार जाहीर केला. त्यावेळी बहिष्कृत हितकारिणीच्या सभेच्यावतीने एक निवेदन सायमन कमिशनला देण्यासाठी तयार करण्यात आले होते. या निवेदनात खालील गोष्टींचा समावेश होता.

१. भारतीय नागरिकांना प्रौढ मतदानाचा अधिकार असावा.

२. प्रांताना स्वायतत्ता असावी.

३. राज्यकारभारावर विधिमंडळाचे नियंत्रण असावे.

४. १४० सदस्यांच्या विधिमंडळामध्ये अस्पृश्यांना १५ जागा याव्यात.

अशा मागण्या या निवेदनात होत्या. परंतु ब्रिटिश सरकारने लंडन येथे गोलमेज परिषद आयोजित केली. या परिषदेला अस्पृश्य समाजातून डॉ. बाबासाहेब आंबेडकर व रावबहादूर श्रीनिवासन (मद्रास) यांना निमंत्रित केले होते.[२०] व ठरल्याप्रमाणे डॉ. आंबेडकर हे लंडनला गोलमेज परिषदेसाठी गेले होते. डॉ. आंबेडकर यांनी पहिल्या गोलमेज परिषदेत अस्पृश्यांच्या मागण्याचा खलिता दाखल केला. त्यात अस्पृश्य समाजासाठी "स्वतंत्र मतदार संघाची" मागणी केली होती. त्याला अर्थातच महात्मा गांधी यानी विरोध केला.[२०]

त्यानंतर स्वतंत्र मतदार संघाच्या मागणीवरून डॉ. आंबेडकर व महात्मा गांधी यांच्यात संघर्ष निर्माण होऊ लागला. त्यामुळे गोलमेज परिषदेत ही मागणी मंजूर होऊ शकली नाही. त्यामुळे १७ ऑगष्ट, १९३२ रोजी रॅम्से मॅकडोनाल्ड यांनी जातीय निवाडा जाहीर केला. या निवाड्याद्वारे डॉ. आंबेडकरांच्या मागणीनुसार ब्रिटिश सरकारने अस्पृश्य वर्गाला स्वतंत्र मतदार संघ दिले. याशिवाय सर्वसाधारण मतदार संघामध्येही त्यांना मताधिकार मिळवून दिला.

महात्मा गांधीना हा निवाडा मान्य नव्हता. त्यामुळे त्यांनी या योजनेला विरोध करून प्राणांतिक उपोषण करण्याचे जाहीर केले व या उपोषणामुळे डॉ. बाबासाहेब आंबेडकर व महात्मा गांधी यांच्यात वाटाघाटी होऊन "पुणे करार" अस्तित्वात आला.

## पुणे कराराची पार्श्वभूमी :

ब्रिटिश पंतप्रधान रॅम्से मॅकडोनाल्ड यांनी जातीय निवाडा जाहीर करुन अस्पृश्यांना स्वतंत्र मतदार संघ दिला. या संबंधीच्या करारातील ९ व्या कलमामध्ये "अस्पृश्य वर्गातील लायक मतदार सामान्य मतदार संघातूनही मत देतील परंतु या एकाच उपायाने अस्पृश्य समाजास कायदेमंडळामध्ये बराच काळ प्रतिनिधित्व मिळणे शक्य नसल्यामुळे त्यांना सामान्य मतदार संघात कांही खास जागा देण्यात येतील. या जागावर अस्पृश्य वर्गीय मतदारच आपला प्रतिनिधी निवडून देतील आणि या मतदारांना साधारण प्रतिनिधी मतदार संघामध्येही मते देण्याचा अधिकार राहील. या निवाड्यानुसार ७१ जागा अस्पृश्यांना मिळाल्या होत्या. गांधीजीनी लगेच त्या विरुद्ध ब्रिटिश सरकारला आपला निर्णय कळविला व जातीय निवाडा रद्द करुन घेण्यासाठी २० सप्टेंबर १९३२ रोजी पुण्याच्या येरवडा तुरुंगात प्राणांतिक उपोषण सुरु केले. ते होऊ नये म्हणून वेगवेगळ्या पुढाऱ्यांनी आपापल्यापरीने डॉ बाबासाहेब आंबेडकरांचे मन वळविण्याचे खूप प्रयत्न केले. उपोषणाच्या आदल्या दिवशी म्हणजे १९ सप्टेंबर, १९३२ रोजी सर चुनिलाल मेहता यांना दिलेल्या मुलाखतीत डॉ. आंबेडकर म्हणतात, "मी माझ्या पवित्र कार्यापासून मुळीच परावृत्त होणार नाही आणि माझ्या जनतेच्या न्याय्य आणि कायदेशीर हितसंबंधाचा त्याग करुन त्यांचा विश्वासघात करणार नाही. मग त्यासाठी तुम्ही रस्त्यावरील खांबावर जरी मला फाशी दिली तरी चालेल." २२ असे उद्गार त्यांनी या संदर्भात काढले होते.

महात्मा गांधींचे उपोषण सुरु होताच डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या बद्दल उलट-सुलट प्रतिक्रिया लोकात निर्माण होऊ लागल्या होत्या. दिवसें-दिवस महात्मा गांधीचे प्राण धोक्यात येत होते. त्यामुळे पंडित मालवीय यांनी हिंदू पुढाऱ्यांची एक परिषद मुंबईत बोलावली आणि गांधीजींच्या

उपवासामुळे झालेला प्रेचप्रसंग सोडविण्यासाठी आवाहन केले. १९ सप्टेंबर १९३२ रोजी डॉ. आंबेडकरांना कळकले, जातीय निवाडयाने अस्पृश्यांना मिळालेल्या अधिकारात व जातीय निवाडयात बदल करण्यासाठी डॉ. आंबेडकर यांच्या संमतीची आवश्यकता होती म्हणून सर्व देशाचे डोळे डॉ. आंबेडकर यांच्याकडे लागले होते. नंतर डॉ. आंबेडकरानी येरवडा तुरुंगात महात्मा गांधींची भेट घेतली व विधिमंडळातील सर्व जागासाठी पॅनेल योजना तयार करण्याची गांधीजींची सूचना केली. आंबेडकरांनी विधिमंडळात १९७ जागांची मागणी केली. तर इतर पुढाऱ्यानी जास्तीत जास्त १२६ जागा देण्यास संमती दिली. परंतु नंतर यात तडजोड होऊन २४ सप्टेंबर १९३२ रोजी येरवडा कारागृहात या करारावर सह्या झाल्या त्यालाच पुणे करार म्हटले गेले.[23] हा करार खालील प्रमाणे होता -

## पुणे करार :

### राखीव जागा -

१) सर्वसाधारण मतदार संघातून अस्पृश्यांना प्रांतिक कायदेमंडळात दर्शविल्या-विल्याप्रमाणे राखीव जागा ठेवण्यात येतील.
मद्रास ३०, आसाम ७, मुंबई (सिंध) १५, बंगाल ३०, पंजाब ८, बिहार-ओरीसा १८, सं.प्रांत २०, मध्यप्रांत २०, एकूण ७८७ जागापैकी १४७ राखीव जागा ठेवण्यात आल्या.

२) या जागांची निवडणूक खालील धोरणाच्या अटीवर संयुक्त मतदार संघातून होईल.

३) सर्वसाधारण मतदार संघात असलेल्या अस्पृश्य मतदारामार्फत अस्पृश्य प्रतिनिधिंची प्राथमिक निवडणूक होईल व प्रत्येक राखीव जागेसाठी पहिले चार उमेदवार उभे राहण्यास लायक ठरतील.

४) मध्यवर्ती कायदेमंडळामध्येही प्रांतिक कायदेमंडळाच्या धोरणानुसार अस्पृश्यांचे प्रतिनिधी निवडण्यात येतील.

मध्यवर्ती कायदेमंडळ :

१) मध्यवर्ती कायदेमंडळामध्ये ब्रिटिश इंडियासाठी संयुक्त मतदार संघाला देण्यात आलेल्या जागापैकी १८ टक्के जागा अस्पृश्यासाठी राखून ठेवण्यात येतील.

२) अस्पृश्य उमेदवार निवडण्याच्या बाबतीत प्राथमिक निवडणूकांचे धोरण प्रांतिक आणि मध्यवर्ती कायदेमंडळात अंगिकारण्यात आले आहे. त्याची मुदत १०० वर्षांनी संपेल किंवा खालील कलम ६ मध्ये दर्शविल्याप्रमाणे आपापसात तडजोड झाली तर मध्यंतरीही ही पध्दत बंद करण्यात येईल.

३) प्रांतिक आणि मध्यवर्ती कायदेमंडळामध्ये १ आणि ४ या कलमान्वये राखीव प्रतिनिधित्वाची जी पध्दत स्विकारण्यात आली आहे ती उभय पक्षांची तडजोड होईपर्यंत चालू राहील.

४) लोथियन कमिटीने शिफारस केलेल्या लायकीप्रमाणे अस्पृश्य समाजाला मताधिकार राहील.

५) कोणत्याही स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीमध्ये किंवा नोकऱ्यांच्या बाबतीत केवळ अस्पृश्य आहे म्हणून प्रतिबंध करण्यात येणार नाही. या बाबतीत अस्पृश्यांना प्रतिनिधित्व देण्याविषयी हरएक प्रयत्न करण्यात येतील.

६) प्रत्येक प्रांतामध्ये शिक्षणाकरिता जी रक्कम मुक्रर करण्यात येते त्यापैकी ठराविक रक्कम अस्पृश्य समाजासाठी मुद्दाम राखून ठेवण्यात येईल.[२४]

या करारामुळे ७८ जागाच्यावरून १४८ जागा अस्पृश्यांना मिळाल्या. परंतु वरदर्शनी जरी पुणे कराराने अधिक जागा मिळालेल्या दिसत असल्या तरी स्वतंत्र मतदार संघ म्हणजे अस्पृश्यांनी आपला स्वत:चा आपल्या विश्वासातील आपला खराखुरा प्रतिनिधी निवडण्याचा अधिकार कायमचा गेला आणि त्याजागी संयुक्त मतदार संघ आला. संयुक्त मतदार संघात जो अस्पृश्य उमेदवार स्पृश्यवर्गाची अधिक मते मिळविल तोच निवडून येतो. याचाच अर्थ स्पृश्य वर्गाच्या मनाला व विचाराला जो अस्पृश्यांचा उमेदवार पटेल, परवडेल त्यालाच ते उभे करणार व निवडून आणणार अशी अवस्था निर्माण झाली. [२५]

या पध्दतीमुळे अस्पृश्य वर्गाचा खरा प्रतिनिधी जो असेल त्यालाच निवडून येण्याची संधी निघून गेली. या नंतरच्या निवडणुकीत स्वत: डॉ. आंबेडकर यांनाही काजरोळकर सारख्या सामान्य उमेदवाराकडून पराभव पत्करावा लागला होता. [२६] त्यामुळे पुणे करारामुळे अधिक जागा मिळाल्यातरी अस्पृश्यांचा स्वतंत्र मतदार संघाचा हक्क कायमचाच गेला आहे. अधून-मधून अस्पृश्यांना स्वतंत्र मतदार संघ असावेत अशी मागणी केली जाते. परंतु याचा उपयोग होत नाही.

अशा अनेकतडजोडी स्विकारत डॉ. आंबेडकर हे अस्पृश्यांना सर्व प्रकारचे अधिकार मिळावेत म्हणून प्रयत्न करीत होते. "बहिष्कृत हितकारिणी सभा" या संस्थेच्या मार्फत त्यांनी अनेक सामाजिक चळवळी केल्या होत्या. परंतु डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे या काळात व्यापक स्वरूपाचा विचार करत होते. १९३५ साली ब्रिटिशांनी भारतासाठी १९३५ चा व्यापक कायदा लागू केला होता. त्यामुळे भारताच्या राजकीय जीवनात अस्पृश्यांना हक्काचे स्थान असावे व अस्पृश्यांना राजकारणात सहभागी होता यावे म्हणून डॉ. आंबेडकरांनी अस्पृश्यांना व कामगार वर्गाला संघटित करून निवडणूका लढविण्यासाठी १५ ऑगस्ट १९३६ रोजी स्वतंत्र "मजूर पक्ष" स्थापन करण्याची घोषणा केली.

स्वतंत्र मजूर पक्षाची स्थापना - पार्श्वभूमी :

१९३० ते ३६ या कालखंडामध्ये कॉंग्रेस पक्ष अधिक लोकप्रिय झालेला होता व या लोकप्रियतेतून कॉंग्रेस पक्षाची हुकूमशाही निर्माण होऊ शकेल काय ? अशी भिती निर्माण झालेली होती. कारण कॉंग्रेस पक्ष हा धनिक व भांडवलदार यांना आश्रय देणारा पक्ष होता. त्यामुळे देशात एकपक्षीय हुकूमशाही निर्माण होऊ नये यासाठी कॉंग्रेस पक्षाला विरोध करणाऱ्या विरोधी पक्षाची आवश्यकता होती. राजकीय पक्षाचे स्वागत करण्याइतकी जागरूकता अस्पृश्य समाजात आलेली आहे असे त्यांना वाटत होते. शिवाय अस्पृश्य सुख-दुःखाशी समरस झालेली सवर्ण हिंदू जातीतील अन्य कांही मंडळी असतील तर त्यांना देखील या नव्या पक्षाचे दरवाजे खुले असतील असेही त्यांनी जाहीर केले होते. [२७] दादासाहेब गायकवाड, श्री डी.व्ही. प्रधान, श्री चित्रे, श्री टिपणीस, श्री कद्रेकर, श्री भोळे, श्री जाधव यांच्या सहकार्याने डॉ. आंबेडकरानी १५ ऑगष्ट १९३६ रोजी स्वतंत्र मजूर पक्षाची घोषणा केली. या पक्षाला स्वतंत्र मजूर पक्ष हेच नांव का दिले असा प्रश्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर याना विचारला असता, त्यानी स्पष्टिकरणार्थ असे सांगितले की, "इतर राजकीय पक्ष संघटने-पासून माझा पक्ष सर्वस्वी स्वतंत्र राहील. परंतु त्याचबरोबर जेथे सहकार्य होणे शक्य आहे अशा कोणत्याही राजकीय पक्षाबरोबर आमचा पक्ष सहकार्य करावयाला तयार होईल. आमच्या पक्षाचा कार्यक्रम प्रामुख्याने मंजूर वर्गाच्या कल्याणार्थ आहे. म्हणून ही मजूर संघटना आहे. ज्या वर्गाचे (मजूर) हित-संबंधाना आमचा पक्ष महत्व देतो त्याच वर्गाच्या उद्धारार्थ योग्य अशाच ध्येय-धोरणावर आमच्या पक्षाची श्रध्दा आहे. दलितवर्ग या नावाऐवजी मजूर हा शब्द योजण्याचा एकच हेतू आहे तो हा. मजूर या वर्गात दलित या वर्गाचा समावेश होतो. पक्षाचे उद्दिष्ट कोणते ? पक्षाच्या कार्यक्रमाबद्दल डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणाले की, "आमच्या पक्षाचा कार्यक्रम सर्वानुमते ठरलेला आहे. आमच्या पक्षाच्या मते नवीन घटनेत (१९३५ चा ॲक्ट) भरपूर

दोष असून "जबाबदार राज्य" ( ) पध्दतीच्या दृष्टीने त्यात फारच उणिवा आहेत. प्रांतिक घटनेच्या वेगवेगळ्या घटकाना आमच्या पक्षाचा विरोध असून विशेषत: वरिष्ठ सभागृह या संस्थेला आमचा प्रखर विरोध आहे. तरी देखील घटनाबध्द राज्यकारभारावर आमचा विश्वास आहे. गव्हर्नरचे जादा राखीव अधिकार जबाबदार पध्दतीला धोकादायक ठरणार नाहीत, अशी खबरदारी आमचा पक्ष घेईल. [२८]

वरील प्रकारचे विचार डॉ. आंबेडकरांनी पक्ष स्थापना केल्यानंतर मांडले होते. इ.स. १९३७ च्या निवडणूकीत स्वतंत्र मजूर पक्षाने भाग घेतला व या निवडणुकीसाठी या पक्षाने आपली भूमिका मांडणारा जाहीरनामा पुढील प्रमाणे प्रसिध्द केला होता.

स्वतंत्र मजूर पक्षाचा जाहीरनामा :

१) नविन सुधारणा विषयक धोरण -

नवीन सुधारणात (राज्यघटनेत) भरपूर दोष व व्यंग असल्यामुळे त्या पूर्ण जबाबदारीचे स्वराज्य प्राप्त करुन देण्यास असमर्थ आहेत. प्रांतिक कारभारातील कित्येक घटना विशेषत: सेकंड चेंबरची घटना ही या पक्षाला आक्षेपार्हच वाटते. तथापि या नवीन सुधारणा राबविण्यास हरकत नाही. मात्र जबाबदारीच्या स्वराज्याचे स्वरुप निष्प्रभ करुन टाकण्याजोगे जे खास अनियंत्रित स्वरुपाचे अधिकार गव्हर्नरास मिळाले आहेत त्याचा उपयोग या मुदतीत होऊ नये याबद्दल हा पक्ष जागृत राहील.

२) आर्थिक धोरण -

अ) शेतीची प्रगती होऊन तो धंदा जास्त फलद्रूप व्हावा म्हणून लॅन्ड मार्गेज बॅंका, उत्पादक शेतकरी वर्गाच्या सहकारी पतपेढ्या व खरेदी-विक्री करणारी मंडळे यांची स्थापना करण्याचा या पक्षाचा विचार आहे.

ब) शेतक-यांचे दारिद्र्याचे प्रत्यक्ष कारण जमिनीची लहान-लहान तुकडयात होणारी विभागणी असून त्यामुळे त्यात भांडवल गुंतवण्यास व सुधारणेच्या पध्दतीने शेती करण्यास बाव मिळत नाही असे या पक्षाचे मत आहे. जमिनीचे तुकडे आणि त्यामुळे शेतकरी वर्गात वावरणारे दारिद्र्य यांचे मुख्य कारण म्हणजे वाढत्या लोकसंख्येला केवळ जमिनीवरच अवलंबून रहावे लागते आणि जमिनीवर अवलंबून रहाणा-या जादा लोकसंख्येच्या पोषणाची शेती व्यतिरिक्त इतर व्यवसायात तजविज लावल्यावाचून शेतक-याचे दारिद्र्य हटणार नाही. या पक्षाचे असे मत आहे की, शेतक-यांना मदत करण्यासाठी आणि त्यांची उत्पादन शक्ती वाढविण्यासाठी इलाख्यातील उद्योग-धंद्यांची वाढ करणे हे मुख्य साधन आहे. म्हणून हा पक्ष चालू उद्योग धंद्याचे पुनरुज्जीवन करून या इलाख्यात उत्पन्न होणा-या कच्च्या मालाच्या अनुरोधाने नवीन उद्योग-धंदे निर्माण करण्याचा प्रयत्न करेल.

क) लोकांना आपल्या धंद्यात प्राविण्य संपादन करण्यास आणि आपली शक्ती वाढविण्यास साधनीभूत होणा-या धंदेशिक्षणाचा विस्तृत कार्यक्रम हाती घेण्याचा हा पक्ष प्रयत्न करेल.

३) लोकहिताच्या दृष्टीने आवश्यक अशा प्रसंगी देशातील उद्योग धंद्यांची मालकी व व्यवस्था सरकारने आपल्याकडे घ्यावी असे या पक्षाचे मत आहे.

इ) जीवनाचा पूर्ण आणि स्वतंत्र उपभोग घेणा-या मार्गात उपस्थित होणा-या सर्व अडचणी नाहिशा करण्यासाठी जी आर्थिक पध्दती एखाद्या विशिष्ट वर्गाला किंवा जनतेच्या विभागाला अन्यायकारक होत असेल तर ती पध्दती बदलणे, सुधारणे किंवा नष्ट करणेही या पक्षाचे अधिकृत कार्य आहे.

ड) सर्वसाधारणपणे जमीनदाराकडून होणारी शेतकरी कुळांची पिळवणूक विशेषत: १) खोती, २) तालुकेदारी

या पध्दतीत असणारी प्रवृत्ती शेतक-यांच्या हिताच्या विरोधी असल्याने त्यापासून शेतकरी कुळांचे रक्षण व्हावे अशा स्वरूपाचे कायदे करण्याचा प्रयत्न हा पक्ष करील.

फ) शेतकरी वर्ग व कामगार वर्ग याना सुधारलेल्या राहणीप्रमाणे राहता यावे यासाठी त्यांच्या मुशाहि-याची किमान मर्यादा ठरविण्याचा हा पक्ष प्रयत्न करील.

ट) कारखान्यातील कामगार वर्गाच्या हितासाठी कारखान्यातील नोकरी, बडतर्फी व पगारवाढ यांच्यावर सरकारी नियंत्रण, कामाचे जास्तीत जास्त तास, कामास योग्य असे वेतन, पगारी रजा वगैरे स्वरूपाच्या उपकारक योजना व वृध्दपण अगर दुसरे योग्य कारण यामुळे कार्यनिवृत होत असताना बोनस, पेन्शन अगर तशीच योग्य प्रकारची दुसरी मदत अशासाठी कायदे-मंडळातील कायदे मंजूर करून घेण्याचे प्रयत्न हा पक्ष करील आणि आजारी-पणा, बेकारी किंवा अपघात अशा प्रसंगी कामगाराची तरतूद करणारी विम्याची खाजगी योजना व कामगारासाठी स्वस्त भाडयाच्या आरोग्याशी इमारतींची उभारणी ही कामे हाती घेण्याचा हा पक्ष प्रयत्न करेल.

ठ) कारखान्यातील कामगारांच्या हिताच्या आवश्यक असे कार्य हा पक्ष करणार आहे. तेच कार्य शेतक-यांच्या हितासाठी आवश्यक अशा स्वरूपात हा पक्ष करील.

य) बेकारी निवारण करण्याची जबाबदारी सरकारवर आहे हे तत्व या पक्षाला कबूल व त्यासाठी शेती, वसाहती व जमीन नसणा-या व बेकार कामगारांना काम मिळविण्यासाठी सरकारी कामे सुरू करण्याच्या योजना अंमलात आणण्याचा प्रयत्न हा पक्ष करील.

र) जबर व्याज व खोटे घोटाळयाचे व्यवहार करणाऱ्या सावकारापासून गरीब ऋणकोंचे संरक्षण होण्यासाठी व शेतकऱ्यांना ऋणमुक्त करण्यासाठी योग्य असे कायदे घडवून आणण्याचा हा पक्ष प्रयत्न करील.

ल) मोठमोठया शहरातील व औद्योगिक कारखान्यांच्या भागात राहणाऱ्या मध्यम स्थितीतील लोकाना सोईस्कर असे घरभाडे पडावे अशा प्रकारचे कायदे हा पक्ष पुढे मांडील.

३) <u>करधारा पद्धती विषयक या पक्षाचे धोरण -</u>

या पक्षाचे असे मत आहे की, सरकारने राष्ट्रसंवर्धक असे अनेक कार्यक्रम हाती घेतले पाहिजेत. पण सरकारच्या हाती पैसा असला तरच या गोष्टी करणे सरकारला शक्य होईल. हा पैसा अर्थात प्रजेकडून कराच्या रूपाने यावयाचा भरपूर पैसा असेल तरच स्वराजाची हमी घेता येते. कर कमी झाला पाहिजे आणि तो राष्ट्र उन्नतीला पोषक असे कार्य न करता आणि तरीही कर कमी झाला पाहिजे . तरच त्यात तुमचे हित आहे. या मताचा प्रसार बहुजन समाजात करणे म्हणजे अज्ञ व गरीब जनतेची दिशाभूल करून फसवणूक करण्यासारखे होय. तथापि कर पद्दती आहे ती राहू द्यावी असे हा पक्ष म्हणत नाही. एवढेच नव्हे तर चालू पद्दत पक्षाला नापसंत आहे. कारण ती अन्यायकारक असून गरीब वर्ग त्यात चिरडला जात आहे. ही विषमता दूर करण्याचा हा पक्ष प्रयत्न करील. चालू जमीनधारा पद्दत अत्यंत आक्षेपार्ह असून ती सुधारण्याविषयी हा पक्ष प्रयत्न करील.

४) <u>सर्व प्रकारच्या सामाजिक सुधारणा :</u>

१) सर्व प्रकारच्या सामाजिक सुधारणा म्हणजे - अ) सनातन्याकडून समाजसुधारकावर पडणाऱ्या बहिष्कारास आळा घालणे.

ब) लोकांना कायद्याने मिळालेले हक्क व जीवन स्वातंत्र्याचा योग्य उपभोग घेणाऱ्या काही व्यक्तिंना अगर विशिष्ट वर्गाला दहशात अगर बहिष्कार घालण्यासारखे प्रयत्न कायद्याने शिक्षेस पात्र ठरणाऱ्या कायद्याची योजना.

२) धार्मिक द्रव्यनिधीचा दुरुपयोग, गैरव्यवस्था होऊ नये म्हणून यासाठी सार्वजनिक धर्मादायिका संस्थावर सरकारी नियंत्रण ठेवणारे कायदे करणे आणि या द्रव्यनिधितून संकल्पित विनियोग होऊन शिल्लक राहिल्यास त्याचा शिक्षणासारख्या मौलिक कार्यात उपयोग करता येणारे कायदे करणे.

३) भिकारी व दुसरे अनाथ निराश्रीत लोक यांच्या तरतुदीची कायद्याने योजना करणे.

५) <u>ग्राम संघटना</u> :

१) ग्राम संघटनेच्या दृष्टिने आवश्यक अशा सुखाची राहणी ग्रामीण जीवनात प्राप्त व्हावी यासाठी शक्य त्या उपायांची योजना करणे.

२) सामान्यत: नगररचनेच्या पध्दतीवरच खेड्याची रचना असावी अशा प्रकारच्या योजनेद्वारा खेडयातील घरे बांधून आरोग्य सुधारणे.

३) खेडयात वाचनालये, सार्वजनिक हॉल, रेडिओ, फिरते सिनेमा यांची योजना करुन जनपदाची परंपरा उंचावण्यात व प्रगतीशील करणे.

४) <u>शिक्षण</u> -

१. मोफत व सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाची योजना अमलात आणणे.
२. साधारणत: साक्षरता प्रसारासाठी अशिक्षित प्रौढ मनुष्याच्या शिक्षणाची योजना.

३. औद्योगिक शिक्षणावर विशेष भर देणे.

४. शिक्षणात मागासलेल्या जातीतील होतकरू तरुणास भारतात व परदेशात उच्च शिक्षण घेण्यासाठी सरकारी मदत मिळेल अशी कायदेशिर योजना करणे.

५. इलाख्यात आवश्यक भागात प्रत्यक्ष शिक्षण देणारी प्रादेशिक विश्व विद्यालये, विद्यालयीन शिक्षणाची पुनर्रचना करण्याचे कायदे हा पक्ष पुढे आणिल. विद्यार्थ्यांचे श्रम व त्यांची बुध्दिमत्ता मातीमोल करुन टाकणाऱ्या परीक्षांची प्रस्तुतची अनिष्ट पध्दती नष्ट करण्याचा प्रयत्न हा पक्ष करेल.

७) राज्यकारभार :

१. राज्यकारभाराची पध्दती सूक्ष्म व परिणामकारक व दोषरहित असावी असे या पक्षाचे प्रयत्न सुरु आहेत.

२. वरील नं. १ पोट कलमातील आदेशासाठी हा पक्ष व आधुनिक परिस्थितीला अनुरुप अशी वेतन पध्दती योजना, या दोन्ही योजना हाती घेईल.

३. सरकारी नोकरीत एके ठिकाणी एकाच जातीचा अगर वर्गाचा भरणा होऊ नये असे या पक्षाचे धोरण आहे. राज्यकारभार परिणामकारक होण्याकरिता इलाख्यातील सरकारी नोकरीत सर्व जाती व वर्गांना योग्य प्रमाणात प्रवेश मिळेल. असे प्रयत्न हा पक्ष करेल. [२९]

वरील प्रकारचा स्वतंत्र मजूर पक्षाचा जाहीरनामा प्रसिध्द करण्यात आला, या जाहिरनाम्यामध्ये सर्वांगीण बाबतीत विचार केला आहे. १९३५ साली ब्रिटिशांनी हिंदुस्थानासाठी १९३५ चा कायदा अंमलात आणलेला होता. परंतु या कायद्यात असंख्य त्रुटी आहेत असे या पक्षाचे मत होते. त्यामुळे या

पक्षाने पहिल्या कलमात असे आश्वासन दिले की, "आम्ही नवीन कायदे करुन पूर्ण जबाबदारीचे स्वातंत्र्य देशाला प्राप्त करुन घेऊन गव्हर्नरला जे अनियंत्रित अधिकार मिळाले आहेत त्याचा वापर होऊ नये म्हणून हा पक्ष प्रयत्न करील.

दुसरे कलम हे आर्थिक सुधारणांचे आहे. देशातील शेतीची प्रगती व्हावी. शेतक-यांच्या मालाला योग्य भाव मिळावा, त्यांना कर्जासाठी योग्य सोयी उपलब्ध व्हाव्यात व त्यांना सुलभपणे भांडवल पुरवठा होईल यासाठी हा पक्ष वचन बध्द आहे. तसेच लोकांनी नवीन उद्योग धंदे सुरु करावेत व त्यांनी धंद्यासाठी प्रोत्साहित व्हावे यासाठी पक्षाने आश्वासन दिले होते. देशाच्या प्रगतीसाठी व विकासासाठी उद्योगधंद्याचे राष्ट्रीयकरण करण्याचे विचार हा पक्ष करेल. शेतक-यांची होणारी पिळवणूक बंद करण्यासाठी ज्या अनिष्ट प्रथा व रुढी आहेत त्या बदलून नवीन कायदे करण्याची ही जबाबदारी या पक्षाने स्विकारलेली दिसते. शेतमजूरांना व कामगारांना किमान वेतन मिळेल. त्यांना चांगल्या प्रकारची सेवा शाश्वती मिळेल व त्यांच्या अडीअडचणी निवारण्यासाठी हा पक्ष योग्य ती पावले उचलण्यास वचनबध्द आहे असे या पक्षाने जाहीरनाम्यात आश्वासन दिले होते. बेकारी निवारण करण्यासाठी सरकार नवीन कामे हाती घेईल व बेकारी नष्ट करण्याचा प्रयत्न करील अशी अनेक आश्वासने देऊन हा जाहिरनामा प्रसिध्द केला होता.

करधारा पध्दतीविषयी या पक्षाने खूपच व्यापकपणे विचार मांडलेला दिसतो. कारण "कल्याणकारी राज्य" या तत्वानुसार सरकारवर देशातील लोकांचा आर्थिक व सामाजिक विकास होण्यासाठी फार मोठी जबाबदारी आली होती. त्यामुळे सरकारने सर्वच क्षेत्रात प्रगती घडवून आणण्यासाठी लोकांच्याकडून अधिक कर गोळा करणे आवश्यक होते. त्यामुळे या पक्षाने

सध:स्थितीत कर धोरणाला विरोध करून त्यात सुधारणा घडविण्याचे आश्वासन या पक्षाने दिले होते.

ग्राम संघटनेच्या बाबतीत खेडयातील सर्व लोकाना चांगल्या प्रकारच्या सुविधा मिळाव्यात, त्यांच्या राहणीमानात व आरोग्यात सुधारणा व्हावी यासाठी या पक्षाने निरनिराळे उपाय योजले होते.

शिक्षणाच्या बाबतीत राज्य कारभार अधिक कार्यक्षम व प्रभावी व्हावा यासाठी हा पक्ष सुधारणा घडवून आणिल व लोकांना चांगल्या प्रकारचा न्याय मिळण्यासाठी न्याय व अंमलबजावणी खाते यांची फारकत करण्यात येईल.

सरकारी नोकरीत एकेठिकाणी एकाच जातीची संख्या वाढू नये व तेथे जातीयवाद निर्माण होऊ नये म्हणून वेगळया उपाययोजना करण्याचे आश्वासन या पक्षाने दिले होते.

या जाहिरनाम्याबद्दल बोलताना नामदेव ढसाळ म्हणतात की, "इतका ध्येयपूर्ण निसंदिग्ध व जनहिताबद्दल दक्षता दाखविणारा जाहिरनामा तत्कालीन राजकीय पक्षात क्वचित सापडेल." [३०]

डॉ. आंबेडकरांनी या जाहिरनाम्यातील आश्वासन पूर्तीसाठी १९३७ च्या निवडणूकीत आपले उमेदवार उभे केले होते. "मतदारानी या निवडणूकीत चांगला प्रतिसाद दिला. पंधरा राखीव जागापैकी ११ जागा या पक्षाने जिंकल्या. त्यामुळे मुंबई विधिमंडळात या पक्षाला विरोधी पक्षाचा दर्जा मिळाला. [३१]

या १९३७ च्या निवडणूकीत डॉ. बाबासाहेब आंबेडकर, श्री आ.कृ. गायकवाड, श्री आर्.आर्. भोळे, पी.जे. रोहम, के.एस्. सावंत, बी.एच्. बराळे, सी.एस्. रोदाळे, डी.जी. जाधव इत्यादी आमदार विजयी झाले होते.

स्वतंत्र मजूर पक्षाने पुढील प्रकारची कार्ये केली आहेत -

स्वतंत्र मजूर पक्षाने १९३७ ते १९३९ च्या दरम्यान अत्यंत महत्त्वाची कामगिरी बजावली. विधिमंडळामध्ये सरकार पक्षाला जर खरी भिती कोणाची असेल तर ती स्वतंत्र मजूर पक्षाची. अशी परिस्थिती निर्माण झाली होती. स्वतंत्र पक्षाच्या आमदारानी विधिमंडळाच्या कामकाजामध्ये हिरीरीने भाग घेतला. त्यांनी विधिमंडळामध्ये अनेक विधेयके मांडली. अनेक विधेयकावर प्रभावी मते मांडली आणि शासनाला विरोध करून सहकार्य केले. स्वतंत्र मजूर पक्षाच्या प्रतिनिधीनी "हरिजन" या गांधीजीनी दिलेल्या विशेषणा-च्या वापराबद्दल तीव्र नापसंती व्यक्त केली. तसेच गांधीजींच्या "वर्धा" शिक्षण पध्दतीवरही टीका केली. अनुसूचित जातीना (१९३५ च्या कायद्यानुसार अनुसूचित जातीची यादी तयार करण्यात आली होती.) शिक्षण घेता यावे यासाठी शासनाने प्रयत्न केले पाहिजेत असे त्यांचे मत होते. त्यांनी अस्पृश्यांना मंदिरात प्रवेश करण्याचा हक्क असला पाहिजे अशी मागणी केली. त्यानुसार शासनाने अस्पृश्यांच्यासाठी मंदिर प्रवेश कायदा संमत केला. खोती-शाही किंवा जमीनदारी नष्ट करण्यासाठी स्वतंत्र मजूर पक्षाच्या प्रतिनिधीनी विधेयक मांडले होते. त्याचप्रमाणे महार वेतन कायदा बनविण्यासाठी त्यांनी विधेयक मांडलेले होते. तसेच औद्योगिक वाद-कायदा बनत असताना त्यातील उणिवा सरकारला दाखवून देण्यात आल्या. तसेच मजूरांच्या संप करण्याच्या हक्कावर सदर कायद्यात मर्यादा आणलेल्या असल्यामुळे स्वतंत्र मजूर पक्षाच्या सर्व सदस्यानी त्यास तीव्र नापसंती व्यक्त केली. एवढेच नव्हे तर साम्यवादी

पक्षाबरोबर सदर प्रश्नावर ७ नोव्हेंबर, १९३८ ला एक दिवसाच्या संपा-मध्ये भाग घेतला. या संपामध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर आघाडीवर होते.[30] या प्रकारची कार्य डॉ. आंबेडकरानी पुढाकार घेऊन केली.

वरील राजकीय कार्यक्षेत्राबरोबरच या पक्षाने कांही सामाजिक चळवळी घडवून आणल्या. परंतु वास्तविक ख-या अर्थाने जर पाहिले तर हा पक्ष जनमानसात लोकप्रिय होऊ शकला नाही व तो काँग्रेसला पर्यायी विरोधी पक्ष म्हणून तुल्यबळ होऊ शकला नाही. कारण या पक्षाला काँग्रेसने अप-प्रचार करुन त्याचे महत्व कमी केले होते. या शिवाय या पक्षाला अस्पृश्यां-च्या शिवाय इतर समाजाचा फारसा पाठिंबा मिळाला नाही. या पक्षाच्या उमेदवारीसाठी जाचक अटी घालण्यात आल्या होत्या. निवडणूकीच्या तिकीट वाटपाचे वेळी असंख्य कार्यकर्ते नाराज झाले होते. त्यामुळे या पक्षाला फार लोकप्रियता मिळू शकली नाही. या पक्षाने कामगार वर्गाच्या संघटना निर्माण केल्या नाहीत. त्यामुळे या पक्षाला व्यापक यश मिळू शकेल नव्हते.

परंतु याच कालखंडात भारताला स्वातंत्र्य देण्यापूर्वी १९४२ मध्ये सर स्टॅफर्ड क्रिप्स यांच्या नेतृत्वाखाली एक ब्रिटिश शिष्टमंडळ भारतात फिरले व त्यांनी निरनिराळया राजकीय पक्षांच्या पुढा-याच्या गाठी घेतल्या. ३० मार्च, १९४२ रोजी क्रिप्स मंडळाने आंबेडकरांशी चर्चा केली त्यावेळी डॉ. आंबेडकरानी स्पष्ट सांगितले की, "अस्पृश्यांच्या संमती शिवाय कोणतीही राज्यघटना त्यांच्यावर लादल्यास तो अस्पृश्यांचा विश्वासघात समजण्यात येईल." त्यामुळे या बैठकीत क्रिप्सने आंबेडकरांना विचारले की, तुम्ही मजूरांचे प्रतिनिधित्व करता की, अस्पृश्यांचे ? या प्रश्नामुळे अस्पृश्यांची स्वतंत्र राजकीय संघटना असावी असा विचार बाबासाहेबांच्या मनात घोळू लागला व त्यांनी संपूर्ण भारतातील अस्पृश्यांसाठी स्वतंत्र राजकीय पक्ष स्थापन करण्याचा निर्णय घेतला.[33]

या निर्णयानुसार या दृष्टीने डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे प्रयत्न सुरु झाले व त्यांनी नवा पक्ष स्थापन करण्याचा निश्चय केला.

शेडयूल्ड कास्ट फेडरेशनची स्थापना, घटना व कार्ये -

अस्पृश्यांचा देशव्यापी राजकीय पक्ष स्थापन करण्यासाठी १७ ते २० जुलै, १९४२ रोजी सर्व अस्पृश्यांचे एक अधिवेशन नागपूर येथे भरविण्यात आले. या अधिवेशनाचे अध्यक्षपदमद्रासचे दलित नेते एन्. शिवराज याना देण्यात आले. या परिषदेत एकंदरीत पाच ठराव करण्यात आले होते. त्यातील ठराव क्रमांक ५ असा होता की, "दलित वर्गाची राजकीय चळवळ चालविण्यासाठी मध्यवर्ती राजकीय संस्था स्थापन्याची वेळ आली आहे. असे या परिषदेचे मत आहे. यासाठी ऑल इंडिया शेडयूल्ड कास्ट फेडरेशन नामक संस्था स्थापन करीत असून स्थानिक सर्व राजकीय संस्थाना तिच्या निमंत्रणासाठी येण्याची विनंती ही परिषद करत आहे. या फेडरेशनची घटना बनविण्यासाठी अध्यक्ष साहेबास एक कमिटी नेमण्याचा अधिकार ही परिषद देत आहे.[३४] असा ठराव मंजूर केला होता.

या ठरावानंतर "ऑल इंडिया शेडयूल्ड कास्ट फेडरेशन" यापक्षाची एक हंगामी कार्यकारिणी निवडण्यात आली. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारातून स्थापन झालेल्या "शेडयूल्ड कास्ट फेडरेशनचे" पहिले अध्यक्ष म्हणून एन्. शिवराज (मद्रास) यांची निवड करण्यात आली होती. या कार्यकारणीत पुढील प्रमाणे अधिकारी नेमण्यात आले होते.

| | |
|---|---|
| एन् शिवराज | अध्यक्ष |
| पी.एन्.राजभोज | जनरल सेक्रेटरी |

तर सदस्य म्हणून --

१) श्री विश्वास, श्री मंडल, श्री रॉय व श्री पुरीया (बंगाल)

२) जाधव, दादासाहेब गायकवाड (मुंबई)

३) कवाडे, शेन्टे, कोसंबे (मध्यप्रांत व-हाड)

४) गोपालसिंग शेठ किसनदास (पंजाब)

५) रावसाहेब शामलाल, रावसाहेब राजसराई, नंदलाल जयस्वाल वाल्मीकी आणि बाबू निळकचंद (संयुक्त प्रांत)

६) श्री कडापल्ली (मद्रास)

अशी हंगामी कार्यकारिणी निवडण्यात आली होती. या कार्यकारी मंडळाची बैठक ता. २०.९.१९४२ रोजी होऊन पक्षघटना मंजूर झाली.[३५] या घटनेत एकूण २१ कलमे स्पष्टपणे लिहिली आहेत. "दा.म.शिर्के यांनी संपादित केलेल्या दलित फेडरेशनच्या विशेष अंकामध्ये शेड्यूल्ड कास्ट फेडरेशनची घटना सविस्तरपणे लिहिली आहे." [३६] ती अभ्यासली असता असे दिसून येते की, ही घटना अतिशय विस्तृत व स्पष्टपणे लिहिलेली आहे. या पक्षाचे ध्येय हे व्यापक आहे. देशातील दलित वर्गाला खास हक्क व दर्जा मिळवून देण्यासाठी व त्यांना त्यांच्या सर्व प्रकारच्या गरजा सोडविण्यासाठी हा पक्ष निर्माण झालेला आहे. असे व्यापक ध्येय या घटनेचे होते. हे पक्षाच्या घटनेतील पहिल्या कलमात स्पष्ट केले आहे.

घटनेच्या दुस-या कलमात पक्षाच्या संघटनेसाठी ग्राम पातळीपासून ते केंद्रिय पातळीपर्यंत पक्षाची कार्यालये असतील. खेडे, शहर, तालुका, ठाणे, मंडळ, तहसिल इत्यादी सर्व विभागात पक्षाच्या विविध शाखा असतील असे स्पष्ट केले आहे.

तर तिस-या कलमात या पक्षाचा सभासद होणा-या व्यक्तिसाठी नियम तयार केलेला आहे व सभासदत्वाची वार्षिक वर्गणीही निश्चित केली

आहे व या सभासदांना पक्षाच्या निवडणूकीत मतदानाचा अधिकार दिला आहे.

चौथ्या कलमात एखाद्या व्यक्तिचे पक्ष सभासदत्व रद्द झाले असेल तर त्याला पुन्हा सभासदत्व मिळविण्यासाठी नियम तयार केला आहे.

पाचव्या कलमात वरीलप्रमाणे असलेल्या सभासदाची यादी व वर्गणीचे रजिस्टर ठेवले जाईल असे स्पष्ट केले आहे.

तर सहाव्या कलमात पक्ष संघटनेत नियंत्रण रहावे यासाठी नियम केले आहेत व प्रांतिक शाखा कशा असतील याचे विवेचन केले आहे. तर सातव्या कलमात कोणत्या सभासदाला पक्षाच्या निवडणूकीत मतदान करता येईल हे स्पष्ट केले आहे व कोणती सभासद व्यक्ति पक्षाच्या निवडणूकीत उभी राहील याचे स्पष्टीकरण दिले आहे.

आठव्या कलमात प्रांतिक मंडळाला कोणत्या प्रकारचे अधिकार असतील हे सांगितले आहे.

नवव्या कलमात प्रांतिक मंडळात किती सभासद असतील व ते कसे निवडता येतील हे सांगितले आहे.

दहाव्या कलमात  जनरल कौन्सिलची निवडणूक पध्दती विषद केली आहे.

अकराव्या कलमात जनरल कौन्सिलची कार्ये स्पष्ट केली आहेत व त्यांचे नियम स्पष्ट केले आहेत.

बाराव्या कलमात मध्यवर्ती कार्यकारी मंडळाची रचना व त्यांचे अधिकार व जबाबदारी स्पष्टपणे लिहिली आहे.

तेराव्या कलमात पक्षाच्या वार्षिक अधिवेशनाच्या वेळी कोणत्या शाखेला काय अधिकार असतील व अधिवेशनाची तयारी कशाप्रकारे करावी व अधिवेशनाचे कामकाज कोणत्या पध्दतीने चालावे याचे स्पष्टीकरण दिलेले आहे.

कलम चौदामध्ये वार्षिक अधिवेशनासाठी कोणाला अध्यक्ष होता येईल व यासाठी नियम तयार केला आहे.

तर पंधराव्या कलमात प्रत्यक्ष अधिवेशनाचे कामकाज कोणत्या पध्दतीने चालविले जाईल हे स्पष्टपणे विवेचन केले आहे.

सोळाव्या कलमात जर पक्षाच्या वार्षिक अधिवेशनाशिवाय जर खास अधिवेशन बोलवावयाचे झाल्यास कोणत्या पध्दतीनुसार ते बोलविता येईल ती पध्दती निश्चित केली आहे.

सतराव्या कलमात पक्षाच्या जनरल सेक्रेटरीची कार्ये स्पष्ट केली आहेत.

अठराव्या कलमात पक्षाच्या संघटनेत रिकाम्या पडलेल्या जागा कशा प्रकारे भराव्यात याचे नियम तयार केले आहेत.

कलम वीसमध्ये पक्षाची घटना, नियम, रजिस्टर, मतदार यादी या साठी नियम करण्यासाठी मध्यवर्ती कार्यकारी मंडळाला अधिकार दिले आहेत.

तर शेवटच्या एकविसाव्या कलमामध्ये ज्या देशातील दलितांच्या लहान-मोठया संघटना असतील तर त्या रद्द करून त्याचे रूपांतर किंवा समावेश अखिल भारतीय शेडयूल्ड कास्ट फेडरेशनमध्ये करता येईल असे स्पष्ट केले आहे.

वरील प्रकारची घटना या पक्षाने तयार केलेली होती.

या पक्षाच्या घटनेप्रमाणे पक्षाच्या कामकाजास सुरुवात झाली होती. या पक्षाने खालील प्रकारची कार्ये केली.

शेड्यूल्ड कास्ट फेडरेशनची कार्ये :

सर्वप्रथम भारताच्या सर्व प्रांतात शेड्यूल्ड कास्ट फेडरेशन या पक्षाच्या शाखा स्थापन करण्यात आल्या. मुंबई, मध्यप्रांत, व-हाड, हैद्राबाद, मद्रास, मर्नाटक, गुजरात, राजस्थान, पंजाब, संयुक्त प्रांत (उत्तर प्रदेश) बंगाल, बिहार, आसाम, ओरिसा इत्यादी ठिकाणी पक्षाच्या शाखा निर्माण करण्यात आल्या होत्या. अस्पृश्य वर्गाच्यासाठी भारतात ज्या लहान मोठया संस्था होत्या त्यासुध्दा शेड्यूल्ड कास्ट फेडरेशन या पक्षात विलीन होऊन कार्य करु लागल्या होत्या.

या पक्षाने नागपूर येथे पहिले अधिवेशन झाले होते. या अधिवेशनात आखिल भारतीय शेड्युल्ड कास्ट फेडरेशन या पक्षाची स्थापना करण्यात आली होती. या परिषदेत एकूण ५० ठराव मंजूर करण्यात आले होते.

दुसरे अधिवेशन -

संयुक्त प्रांतात कानपूर शहरी ता. २९, ३० व ३१ जानेवारी, १९४४ रोजी रावबहादूर एन्. शिवराज यांच्या अध्यक्षतेखाली आखिल भारतीय दलित फेडरेशनचे दुसरे अधिवेशन यशस्वी रीतीने पार पडले. या अधिवेशनाच्या प्रसंगी "समता सैनिक दल" व "महिला समाज" यांच्याही परिषदा झाल्या. त्यावेळी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची उपस्थिती लाभल्यामुळे व त्यांनी प्रसंगोपात केलेल्या उपदेशामुळे संयुक्त प्रांतातील अस्पृश्य वर्गात नवचैतन्य संचारले गेले हे उघड आहे. [३७] या अधिवेशनात एकूण १२ ठराव मंजूर करण्यात आले होते.

तिसरे अधिवेशन :

मुंबई शेड्यूल्ड कास्ट फेडरेशनने आखिल भारतीय दलित वर्ग परिषदे-च्या तृतीय अधिवेशनाची पत्करलेली जबाबदारी चोखरीतीने बजावून आपली कामगिरी चिरस्मरणीय करून ठेवली. याबद्दल त्यांना धन्यवाद मिळाले, आहेत.[३८] ही परिषद ४ ते ६ मे १९४५ रोजी मुंबईतील परळ विभागात भरविण्यात आली होती. या परिषदेत डॉ. आंबेडकर व एन्. शिवराज यांची मार्गदर्शनपर भाषणे झाली होती.

या पद्धतीची निरनिराळी अधिवेशने भरवून पक्षाच्या कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करण्याचे कार्य "शेड्यूल्ड कास्ट फेडरेशन" करत असे. या फेडरे-शनचे "दलित वर्ग विद्यार्थी परिषद", मुनसिपल कामगार परिषद, आखिल भारतीय दलित महिला परिषद, अशा शाखा निर्माण होऊन या पक्षाचे कार्य अतिशय उत्साहात व जोमात चालले होते. सर्व दलित समाज या पक्षाच्या झेंड्याखाली एकवटला होता. या पक्षाने निवडणुकात भाग घेण्याचे ठरविले होते. ११ मार्च, १९४६ च्या निवडणूकीत शेड्यूल कास्ट फेडरेशा-ननेही भाग घेतला. डॉ. बाबासाहेबांनी दिल्ली, आग्रा, अहमदाबाद, मुंबई या ठिकाणी जाऊन आपल्या उमेदवारांच्या प्रचाराची भाषणे केली. परंतु अस्पृश्यांसाठी संयुक्त मतदार संघ असल्याने अस्पृश्य उमेदवारांना सवर्ण हिंदूंची मते मिळाली नाहीत. परिणामी शेड्यूल्ड कास्ट फेडरेशनचा दारूण पराभव झाला.[३९]

त्यामुळे या पराभवाने खचून न जाता शेड्यूल्ड कास्ट फेडरेशन हा पक्ष कार्य करतच राहिला. २६ जानेवारी १९५० पासून राज्यघटनेचा अंमल भारतात सुरू झाल्यानंतर इ.स. १९५२ साली देशात पहिल्या सार्वत्रिक निवडणूका जाहीर झाल्या होत्या. या निवडणूकीत शेड्यूल्ड कास्ट फेडरेशन या पक्षानेही भाग घेतला होता. १९५२ च्या निवडणूकीपूर्वी

शेडयूल्ड कास्ट फेडरेशनने निवडणूक जाहिरनामा प्रसिध्द केला. त्याच्या अर्ध्या भागात आंबेडकरांनी कांही तत्वे सांगितली होती. धार्मिक, आर्थिक व राजकीय स्वातंत्र्य प्रत्येकाला अन्न, वस्त्र, निवारा व भय यापासून मुक्तता करण्याची जबाबदारी क्षमता, स्वातंत्र्य व बंधुता यावर भर, व्यक्ति, वर्ग व राष्ट्र यांची पिळवणूकीपासून मुक्तता व संसदीय लोकशाही भारतातील पद-दलित समाजासाठी राबवणे ही तत्वे असल्याचे त जाहिरनाम्यात म्हंटले होते. म्हणून त्या दृष्टीने शेडयूल्ड कास्ट फेडरेशन ही जातीय संस्था असल्याचे आरोप कोणी करत नव्हते. कॉंग्रेसला आतापर्यंत बडया भांडवलदारांच्या पाठिंबा होता. आणि त्याच्या मलिधावरच ती वाढली असल्याचे त्यात म्हंटले होते.

कॉंग्रेस सरकारच्या धोरणामुळे आंतरराष्ट्रीय राजकारणात भारताला मित्र राहिला नाही. काश्मीरची फाळणी करावी. काश्मिरातील मुसल-मानानी पाकिस्तानात जावे. जम्मू आणि लडाख हे भाग भारताकडे यावेत असे जाहिर नाम्यात म्हंटले होते. चीनला युनोत प्रवेश मिळावा म्हणून भारताने प्रयत्न चालवला पण त्यामुळे भारत आणि अमेरिका यांच्यात वितुष्ट निर्माण झाले म्हणून आपल्याला अमेरिकेची मतद मिळत नाही. भांडवलशाही विषयीची अप्रिती समजू शकते, पण संसदीय लोकशाही दुर्बल करुन हुकूमशाहीला प्रोत्साहन तर मिळत नाही ना ? हे पाहिले पाहिजे. असेही विचार त्यात मांडले होते. आयुर्विम्याचे राष्ट्रीयकरण, सरकारी नोकरांना सक्तिने विमा उतरण्यास लावणे व दारुबंदीसंबंधी कार्यक्रम त्यात होते. दारुबंदी विषयी लिहिताना त्या जाहिरनाम्यात प्रश्न विचारला होता. प्राधान्य कोणाला ? दारुबाजाला का भुकेल्याना ? [४०]

या पध्दतीचा जाहिरनामा प्रसिध्द करुन या पक्षाने निवडणूका लढवल्या होत्या. परंतु या निवडणूकीत शेडयूल्ड कास्ट फेडरेशनला प्रचंड पराभव

पत्करावा लागला होता. राखीव जागावर कॉंग्रेसचेच उमेदवार निवडून आले. खुद्द डॉ. आंबेडकरही पराभूत झाले. सोलापूरहून पी.एन्. राजभोज व करिमनगरहून कृष्णान् असे ३५ पैकी केवळ दोनच उमेदवार लोकसभेवर निवडून गेले. व विविध प्रांतात मिळून विधानसभेवर १२ सदस्य निवडून गेले. [४१]

वरील दोन्ही निवडणूकीतील या पक्षाची कामगिरी पहाता ती अतिशय निराशाजनक होती. कारण या निवडणूकांत या पक्षाला जास्त जागा घेता आल्या नाहीत. शिवाय १९५४ साली भंडारा पोटनिवडणूकीत डॉ. आंबेडकर पुन्हा पराभूत झाले होते. त्यामुळे या पक्षातील कार्यकर्ते निराश झालेले होते. त्यामुळे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी १५.५.१९५४ रोजी एळगांव येथे भाषण केले त्या भाषणात ते म्हणतात की, "इलेक्शन ही क्रिकेटची मॅच आहे. क्रिकेटमध्ये पराभव झालेली टीम गाशा गुंडाळून स्वस्थ बसत नाही. ती पुन्हा दुसऱ्या वर्षी नव्या जोमाने खेळावयास प्रारंभ करते. असाच आशा-वाद आपण ठेवला पाहिजे. दोन वर्षापूर्वी लखनौला भाषण देताना कॉंग्रेस हे जळत घर आहे, असे मी सांगितले होते याचे तुम्हांला प्रत्यंतर आले असेल. आता या घरात फक्त आडे जे नेहरू तेच उरले आहे. तेही थोडयाच दिवसात जळून जाईल. आपल्या जवळ आर्थिक बळ नाही. फक्त राजकीय सामर्थ्य आहे. शरण जाणे माणसाला शोभत नाही. प्रसंगात माणूस शरण जातो. पण पुन्हा तलवार हाती घेतो. आपली स्थिती यापुढे ५२ च्या निवडणूका-प्रमाणे होणार नाही. मनुष्य कितीही दीर्घायुषी असला तरी त्याला उतरती कळा लागणारच पण आपला मग उत्कर्षच होणार आहे, म्हणून संघटना मजबूत करा हेच माझे नेहमीचे निक्षून सांगणे आहे." [४२]

परंतु असे उपदेशाचे सल्ले देऊनही या पक्षाची उतरती कळा लागलेली होती. या पक्षाने निवडणूकीव्यतिरिक्त आणखी महत्त्वाची कार्ये केली होती. निरनिराळया प्रकारचे सत्याग्रह करून आपल्या न्याय्य मागण्या

पूर्ण करण्याचा प्रयत्न या पक्षाने केला होता. परंतु देशाच्या स्वातंत्र्य-प्राप्तीनंतर देशात जातीयवादी पक्षाची आवश्यकता उरली नव्हती. सुरवातीच्या काळात जमातीचे कल्याण करणे हा दृष्टिकोन संकुचित असल्याची जाणीव आंबेडकरांना झाली होती. त्यामुळे त्यांना हा पक्ष बरखास्त करावा असे वाटू लागले होते. व सर्वव्यापक, सर्व समावेशक असा रिपब्लिकन पक्ष स्थापन करावा असे त्यांना वाटू लागले होते. परंतु त्यांचे ६.१२.१९५६ रोजी महानिर्वाण झाल्याने त्यांच्या संकल्पनेतील रिपब्लिकन पक्ष अजिबात अस्तित्वात आला नाही. त्यामुळे त्यांचे हे स्वप्न अपुरे राहिले.

डॉ. आंबेडकरांच्या नंतर दलित समाजाला संघटित करून त्यांचे नेतृत्व करेल असा नेता पक्षात राहिलेला नव्हता. डॉ. आंबेडकरांच्या महानिर्वाणानंतर दलितांची अवस्था सैरभैर झाली होती. त्यामुळे सर्व दलितांना संघटित ठेवण्यासाठी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे स्वप्न साकार करण्यासाठी शेड्यूल्ड कास्ट फेडरेशनमधील सर्व प्रमुख नेत्यांनी एकत्र येऊन "सामुहिक मंडळ" (प्रिसिडियम) स्थापन करण्याचे ठरविले होते.

या सामुहिक नेतृत्वाची निवड करण्यासाठी व त्याच्या कार्याची दिशा ठरविण्यासाठी ३१ डिसेंबर, १९५६ रोजी शेड्यूल्ड कास्ट फेडरेशनच्या कार्यकारी मंडळाची बैठक घेण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी राजाभाऊ खोब्रागडे होते. सदर प्रसंगी देशातील अनेक राज्यातून मान्यवर नेते हजर झालेले होते. ही बैठक दोन दिवस चालली. सदर बैठकीमध्ये बॅ. राजाभाऊ खोब्रागडे यांची एकमताने निवड करण्यात आली. जनरल सेक्रेटरीची निवड करण्याचा अधिकार त्यांना देण्यात आलेला होता. त्यानुसार श्री हरदास आवळे यांची पक्षाचे जनरल सेक्रेटरी म्हणून निवड करण्यात आली. [४३]

त्यानंतर बॅ. राजाभाऊ खोब्रागडे यांच्या अध्यक्षतेखाली दि.३१/१२/५६ व १/१/५७ रोजी अहमदनगर येथे आखिल भारतीय दलित फेडरेशानच्या कार्यकारिणीच्या (वर्किंग कमिटीच्या) खास बैठकीत निरनिराळे ११ ठराव करण्यात आले. त्यातील ठराव क्र. ३ नुसार "प्रिसिडियम्" सर्वोच्च मध्यवर्ती मंडळ

अ) डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे आकस्मितपणे महानिर्वाणास गेले. त्यांच्या महानिर्वाणामुळे अस्पृश्य मानलेल्या समाजाच्या, त्याचप्रमाणे त्यांच्या आदेशाप्रमाणे बौध्द दिक्षा घेतलेल्या बौध्द समाजाच्या चळवळींना प्रचंड धक्का बसला आहे. विशेष करून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी प्रस्थापिलेल्या संस्था म्हणजे -

१) अखिल भारतीय दलित फेडरेशान
२) अखिल भारतीय बौध्द महासभा
३) दि पिपल्स एज्युकेशान सोसायटी
४) दि शेडयूल्ड कास्ट ईंप्रुव्हमेंट ट्रष्ट मुंबई
५) कनिष्ठ गावकामगार असोसिएशान मुंबई
६) बुध्दभूषण प्रिंटिंग प्रेस मुंबई
७) प्रबुध्द भारत (मराठी साप्ताहिक मुंबई)

या व इतर संस्थांचा एकमेव आधार स्तंभ गेला आहे.

ब) डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या मागे त्यांच्या चळवळीत आजमितीस तरी एकही व्यक्ती अशी प्रभावी नाही की, ती व्यक्ति बाबासाहेब आंबेडकरांनी स्थापन केलेल्या वरील सर्व संस्थांचा जबाबदाऱ्या पार पाडण्यास, त्यांच्या चळवळीत त्यांच्या मागे सध्या तरी एकही व्यक्ति प्रभावी दिसत नाही. असे या कार्यकारिणीचे मत पूर्ण विचारांती बनलेले आहे.

क) तेव्हा वर वर्णन केलेल्या परिस्थितीत नूतन बौध्दजनांच्या प्रतिनिधीं-च्या संमतीने ही कार्यकारिणी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी वरील संस्थांचे संस्थापक व एकमेव चालक या दृष्टीने व जे जे अधिकार वापरले ते सर्व अधिकार खालील व्यक्तिंच्या प्रिसिडीयममध्ये सुपूर्त करत आहे.

१) श्री राजाभाउ खोब्रागडे, बी.ए. बार अॅट लॉ, अध्यक्ष,
अ.भा. ि. दलित फेडरेशन.
२) श्री दादासाहेब गायकवाड - महाराष्ट्र दलित फेडरेशन (नाशिक)
३) श्री बी.टी. परमार - गुजरात दलित फेडरेशन (अहमदाबाद)
४) श्री ए. रत्नय - मद्रास राज्य, दलित फेडरेशन एम्.एल्.ए. (मद्रास)
५) श्री आर.डी. भंडारे - एम्.ए.एल्.एल्.बी., अध्यक्ष,
मुंबई प्रदेश दलित फेडरेशन (मुंबई)
६) के.बी. तळवरकर - एम्.ए. (मुंबई)
७) बी.सी. कांबळे - बी.ए., एलएल्.बी., एम्.एल्.ए. (मुंबई)

वरील प्रकारे समिती नेमण्यात आली. दिनांक ३१ डिसेंबर, १९५६ रोजी प्रेसेडियमची स्थापना करण्यात आली. बाबासाहेबांच्या ठायी प्रेसेडियमला मानायचे या निर्णयाला सर्व प्रमुखानी व कार्यकर्त्यांनी स्वत:स बांधून घेतले. कांही काळ ह्या प्रेसेडियमने चळवळीत आपली हुकूमत चालवली. परंतु नेतृत्वाच्या संघर्षापायी प्रेसेडियम लवकरच मोडकळीस आली व बरखास्त न करताच ते अंतर्धान पावली. [४५] त्यामुळे हे प्रेसेडियम संपुष्टात आले होते.

व याच कालावधीत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महानिर्वाणा-नंतरच्या काळात देशात दुसऱ्या १९५७ च्या सार्वत्रिक निवडणूका जाहीर झाल्या होत्या. या निवडणूकीत शेड्यूल्ड कास्ट फेडरेशन या जुन्या पक्षाच्या नावाखालीच निवडणुका लढविण्याचे या पक्षाच्या नेत्यांनी

ठरविले होते. या निवडणुकीत दादासाहेब गायकवाड, बी.सी. कांबळे, मा. एस.के. डिगे, जी.के. माने, हरिहरराव सोनुले, दता कटी, एन्.शिवराज, के.मु.परमार, बी.डी. साळुंखे व याच प्रमाणे कर्नाटक विधि मंडळावर दोन उमेदवार मुंबई विधिमंडळावर १३ उमेदवार, पंजाब विधिमंडळावर ५ उमेदवार असे एकूण २० उमेदवार निवडून आले होते. [४६]

हे सर्व उमेदवार रिपब्लिकन पक्षाची स्थापना झाल्यावर या पक्षात येऊन दाखल झाले होते.

रिपब्लिकन पक्षाचा उदय व स्थापना :

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी देशातील सर्व दलितांना राजकीय दृष्टया संघटित करण्यासाठी व त्यांना सर्व प्रकारचे हक्क मिळवून देण्यासाठी "बहिष्कृत हितकारणी सभा" या संस्थेच्या स्थापने नंतर स्वतंत्र मजूर पक्ष शेड्यूल्ड कास्ट फेडरेशन हे दोन पक्ष निर्माण केले होते. परंतु स्वतंत्र मजूर पक्षाला फारशी लोकप्रियता न मिळाल्यामुळे हा पक्ष बरखास्त करून डॉ. आंबेडकरांनी "आखिल भारतीय दलित फेडरेशन" हा पक्ष निर्माण केला. या पक्षाने सार्वत्रिक निवडणूकात भाग घ्यायला सुरवात केली होती. परंतु या पक्षाला प्रचंड पराभव पत्करावा लागला होता. म्हणून त्यांना शेड्यूल्ड कास्ट फेडरेशन हा पक्ष बरखास्त करून "रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया" हा पक्ष स्थापन करावयाचा होता. त्यांनी आपण रिपब्लिकन नावाचा एक राजकीय पक्ष काढणार आहोत असे त्यांनी जाहीर केले होते व तो पक्ष सर्वांना खुला असेल, त्यात ३ मार्गदर्शक तत्वे स्वातंत्र्य, समता व बंधुता ही असतील [४७] असे सांगितले होते.

त्यामुळे त्यांचे हे उद्गार खरे करण्यासाठी ३ ऑक्टोबर १९५७ रोजी

नागपूर येथे शेडयूल्ड कास्ट फेडरेशनचे अखेरचे अधिवेशन भरले होते. या अधिवेशनात शेडयूल्ड कास्ट फेडरेशन हा पक्ष बरखास्त करुन "रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया" हा पक्ष स्थापन करावयाचे निश्चित झाले व अशा स्वरूपाच्या ठरावाला बी.एस. गोरे व बी.पी. मौर्य या दोघांनी अनुमोदन दिले. यावेळी बी.पी.मौर्य म्हणाले की, "नदी ओलांडून पैलतीरी गेल्यानंतर पुढील प्रदेशात वाटचाल करताना नदीपार करण्यासाठी वापरलेली होडी कोणी खांद्यावर वाहून नेत नाहीत. भारतात अस्पृश्याना राजकीय अस्तित्व नव्हते. ते मिळण्यास दलित फेडरेशनची होडी आम्हाला उपयोगी पडली आहे. आम्ही नदी ओलांडलेली आहे. कॉंग्रेसच्या पंजातून अस्पृश्यांना, दीन-दुबळ्यांना सोडविण्याचे काम देखील दलित फेडरेशनने केले. बाबासाहेबांच्या तालमीत आम्ही शत्रू पक्षाबरोबर दोन हात करायला आता समर्थ झालो आहेत, आम्ही कमावलेली ताकद आता खुल्या मैदानात शत्रू पक्षाशी दोन हात खुले करुन आम्हाला आजमावून पाहावयाची आहे. आणि म्हणूनच दलित फेडरेशनचे विसर्जन करुन आम्ही "रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाची" स्थापना करत आहोत. [४८]

व अशा पध्दतीने रीतसर रिपब्लिकन पक्षाची स्थापना ३ ऑक्टोबर १९५७ रोजी झाली.

## समारोप :

महात्मा जोतीबा फुले, गोपाळ बाबा वलंगकर यानी समाज सुधारणेचा पाया घातला. त्यांनी समाजातील अत्यंत नीच व अस्पृश्य समजल्या गेलेल्या वर्गासाठी संघटितरीत्या त्या त्यांचे प्रश्न, समस्या सोडविण्याचा प्रयत्न केला. "सत्यशोधक समाज", "अनार्य दोष परिहार मंडळी" इत्यादी संस्था निर्माण करुन त्यांनी बहुजन समाजात व अस्पृश्यांत जागृती निर्माण केली. अस्पृश्यांना

12647
A

शाळा काढून त्यांना सुशिक्षित करण्याचा पहिला मान महात्मा फुले यांना द्यावा लागतो. ब्रिटिशांनीसुध्दा शिक्षणाचे सार्वत्रिकरण केल्याने व आधुनिक ज्ञानाचा प्रसार केल्याने बहुजन समाजात जागृती निर्माण होऊ लागली. महात्मा फुलेंच्या नंतर महर्षी शिंदे यानी डिप्रेसड क्लासेस मिशन या संस्थेद्वारे अस्पृश्यांच्यासाठी मोलाचे कार्य केले आहे. त्यानी स्वत:चे संपूर्ण आयुष्य अस्पृश्यांच्या सेवेसाठी व्यथित केले आहे. "सुशिक्षित व सुसंस्कृत वर्गीयाकडून जे काही घेण्यासारखे आहे ते अवश्य घ्यावे आणि आपला उध्दार करून घ्यावा. असे न करता केवळ रूढ कल्पना आपल्या उराशी बाळगून त्यांच्या बद्दल मत्सरग्रस्त पूर्वग्रह मनात उगाळत बसून कांही आपला कार्यभार होणार नाही ही गोष्ट जशी मागासवर्गीयांनी अंमलात आणावयाची आहे तसेच उच्चवर्गीयांनी देखील आपला अहंभाव विसरून मागासलेल्या लोकांच्याकडे तुच्छतेने न पाहता त्याला आपल्यातच वागवून घ्यावे हे परिणामी हितकर होणार आहे" असे ते नेहमीच म्हणात असत.

कर्मवीर शिंदे यांच्यानंतर छत्रपती शाहू महाराजांनी कोल्हापूर संस्थानात अस्पृस्यतेविषयी फार महत्त्वाचे कार्य केले. त्यांचे कार्य म्हणजे त्यांनी अस्पृश्यांसाठी अनेक पुरोगामी कायदे आपल्या संस्थानात अंमलात आणले होते. त्यांच्या प्रेरणेमुळे डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे सार्वजनिक जीवनात कार्य करू लागले. आंबेडकरांनी "बहिष्कृत हितकारिणी सभा" या संस्थेच्या माध्यमाने अनेक सामाजिक चळवळी यशस्वी केल्या. "स्वतंत्र मजूर पक्ष" व शेडयूल्ड कास्ट फेडरेशन हे दोन राजकीय पक्ष निर्माण करून दलिताना राजकीयदृष्टया संघटित केले. "शेडयूल्ड कास्ट फेडरेशन"च्या निवडणूकीतील कार्याच्या अपयशामुळे त्यांना त्यांच्या उत्तरार्धात हा पक्ष बरखास्त करून त्यांना "रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया" हा पक्ष स्थापन

करावयाचा होता. परंतु त्यांच्या ६.१२.१९५६ रोजी महानिर्वाण झाल्याने त्यांचे हे स्वप्न साकार होऊ शकले नाही. परंतु त्यांच्यानंतर आंबेडकरांच्या अनुयायांनी कांही काळ सामुहिक नेतृत्व प्रिसिडीयम निर्माण केले होते. नंतर ३.१०.१९५७ रोजी "रिपब्लिकन" पक्षाची रीतसर स्थापना करण्यात आली होती.

........

# प्रकरण पहिले

## संदर्भ यादी


१. चांगदेव खैरमोडे, डॉ. आंबेडकर यांच्या चळवळीची पार्श्वभूमी, श्रीविद्या प्रकाशन, पुणे, १९७६, पृ.क्र. ८.

२. जी.एल्.भिडे व एन्.डी. पाटील, महाराष्ट्रातील समाजसुधारणेचा इतिहास, फडके प्रकाशन, कोल्हापूर, १९८८, पृ.क्र. २८.

३. गंगाधर पाणतावणे, वादळाचे वंशज, प्रचार प्रकाशन, कोल्हापूर, १९८९, पृ.क्र. ७.

४. दत्ता जी. कुलकर्णी, महात्मा फुले समाजक्रांतीचा अग्रदूत, रघुवंशी प्रकाशन, पुणे, १९७८, पृ.क्र. ७९.

५. जी.एल्.भिडे व एन्.डी. पाटील, महाराष्ट्रातील समाजसुधारणेचा इतिहास, फडके प्रकाशन, कोल्हापूर, १९८८, पृ.क्र. ७९.

६. जी.एल्.भिडे व एन्.डी. पाटील महाराष्ट्रातील समाजसुधारणेचा इतिहास, फडके प्रकाशन, कोल्हापूर, १९८८, पृ.क्र. ७८.

७. जोतीराव फुले समग्र ग्रंथ, अधिकारी प्रकाशन, मुंबई, १९९१, पृ.क्र. ७

८. मा.प. मंगुडकर, कर्मवीर शिन्दे यांचे जीवन व कार्य, सुवर्णा मंगुडकर प्रकाशन, पुणे, १९७६, पृ.क्र. २५.

९. मा.प. मंगुडकर, कर्मवीर शिन्दे यांचे जीवन व कार्य, सुवर्णा मगुडकर प्रकाशन, पुणे, १९७६, पृ.क्र, २५.

१०. शंकरराव खरात, अस्पृश्यांचा मुक्तीसंग्राम, पेतर्स जोशी व लोखंडे प्रकाशन, पुणे, १९७०, पृ.क्र. १२.

११. डॉ. गणपतराव सुर्यवंशी, राजा शाहू आणि समाज प्रबोधन, रणजित प्रकाशन, इचलकरंजी, १९७८, पृ.क्र. ६२.

१२. डॉ. गणपतराव सुर्यवंशी, राजा शाहू आणि प्रबोधन, रणजित प्रकाशन , इचलकरंजी, १९७८, पृ.क्र. ७७.

१३. द.म. शिर्के, राजर्षी शाहू महाराज गौरवग्रंथ, प्रका. महाराष्ट्र राज्य शिक्षण विभाग, मुंबई, १९७६, पृ.क्र. ४९५.

१४. संपादक रमेश ढावरे, माणगाव परिषद विशेष अंक, प्रकाशक स्मृती महोत्सव, कोल्हापूर, १९८२, पृ.क्र. ३.

१५. द.म. शिर्के, राजर्षी शाहू महाराज गौरव ग्रंथ, प्रकाशन महाराष्ट्र राज्य शिक्षण विभाग, मुंबई, १९७६, पृ.क्र. ५०३.

१६. बा.ना. कुबेर, डॉ. आंबेडकर विचारमंथन, प्रकाशक आर.जी.देसाई, मुंबई, १९८२, पृ.क्र. २०.

१७. आर.के. क्षिरसागर, भारतीय रिपब्लिकन पक्ष, पी.एस्. चिक्कलठाणकर, नाथ प्रकाशन, औरंगाबाद, १९७९, पृ.क्र. २.

१८. लोकराज्य, डॉ. बाबासाहेब आंबेडकर जन्म शताब्दी विशेषांक, मुंबई १९९१, पृ.क्र. ९.

१९. बळवंत हणमंतराव वटाळे, डॉ. आंबेडकरांचा सांगाती, श्रीविद्या प्रकाशन, पुणे, १९८८, पृ.क्र. ३३.

२०. आर.के. क्षिरसागर, भारतीय रिपब्लिकन पक्ष, पी.एम्. चिक्कलठाणकर, नाथ प्रकाशन, औरंगाबाद, १९७९, पृ.क्र. ४.

२१. शंकरराव खरात अस्पृश्यांचा मुक्तीसंग्राम, मेसर्स जोशी व म.द.लोखंडे प्रकाशन, पुणे, १९६८, पृ.क्र. ५५.

२२. अ.ज.परब, डॉ. बाबासाहेब आंबेडकर एक चिंतन एक प्रगटन, प्रकाशक अनिल मेहता, पुणे, १९९१, पृ.क्र. ३२.

२३. शंकरराव खरात, अस्पृश्यांचा मुक्तिसंग्राम, मेसर्स जोशी व म.द.लोखंडे प्रकाशन, पुणे १९६८, पृ.क्र. ७०

२४. शंकरराव खरात, अस्पृश्यांचा मुक्तीसंग्राम, मेसर्स जोशी व म.द.लोखंडे प्रकाशन, पुणे, १९६८, पृ.क्र. ७१.

२५. शंकरराव खरात, अस्पृश्यांचा मुक्तीसंग्राम मेसर्स जोशी व म.द. लोखंडे प्रकाशन, पुणे, १९६८, पृ.क्र. ७४.

२६. आर.के. क्षिरसागर, भारतीय रिपब्लिकन पक्ष, पी.एस्. चिक्कळठाणाकर नाच प्रकाशन, औरंगाबाद, १९७९, पृ.क्र. २३.

२७. श्री कृष्णा मेणासे, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या सामाजिक व राजकीय चळवळी, लोकवाङ्मय गृह मुंबई, १९९२, पृ.क्र. २९.

२८. शंकरराव खरात, डॉ. आंबेडकरांच्या सहवासात, प्रकाशक ग.ल.ठोकळ पुणे, १९६१, पृ.क्र. १६८.

२९. संपादक अरुण कांबळे, जनता पत्रातील लेख, प्रकाशक रामदास भटकळ मुंबई, १९९२, पृ.क्र. २९० ते २९४.

३०. डॉ. भुषण जोरगुलवार, डॉ. बाबासाहेब आंबेडकर गौरव ग्रंथ, नंदिनी गवळी, कोल्हापूर, १९९१, पृ.क्र. ३०९.

३१. भास्कर लक्ष्मण भोळे, पूजासुर्य, नंदिनी गवळी, कोल्हापूर, १९९० पृ.क्र. ३५६.

३२. आर.के. क्षिरसागर, भारतीय रिपब्लिकन पक्ष, पी.एस्. चिक्कळठाणकर, नाथ प्रकाशन, औरंगाबाद, १९७९, पृ.क्र.९.

३३. उर्मिला पवार / मिनाक्षी पुत्र, आम्हीही इतिहास घडवला, प्रकाशक स्त्री उवाच मुंबई, १९८९, पृ.क्र. ७६.

३४. रामचंद्र क्षिरसागर, भारतीय रिपब्लिकन पक्ष, पी.एस्. चिक्कळठाणकर, नाथ प्रकाशन, औरंगाबाद, १९७९, पृ.क्र. १६.

३५. – उपरोक्त, पृ.क्र. १८.

३६. संपादक, दा.म. शिर्के, साप्ताहिक गरूड, दलित फेडरेशन विशेषांग, कोल्हापूर, जुलै, १९४५, पृ.क्र. ४.

३७. संपादक दा.म. शिर्के सा. गरूड, दलित फेडरेशन विशेषांक, कोल्हापूर जुलै, १९४५, पृ.क्र. १४.

३८. संपादक दा.म. शिर्के सा. गरूड , दलित फेडरेशन विशेषांक, कोल्हापूर जुले, १९४५, पृ.क्र. १७.

३९. संपादक टि.ए. गवजी व इतर, डॉ. बाबासाहेब आंबेडकर गौरव ग्रंथ, प्रकाशक नंदिनी गवळी, कोल्हापूर, १९९१, पृ.क्र. ३१६.

४०. वा.ना. कुबेर, डॉ. आंबेडकर विचार मंथन, प्रकाशक आर.जी.देसाई लोक वाड्.मय गृह मुंबई, १९८२, पृ.क्र. २३१.

४१. डॉ. भुषन जारेगुळवार, डॉ. बाबासाहेब आंबेडकर गौरव ग्रंथ, संपा. गवळी कोल्हापूर, १९९१, पृ.क्र. ३१६.

४२. संपादक मा.फ. गांजरे, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची वृत्तपत्रे खंड ६ वा, प्रका. मी.फ. गांजरे, नागपूर, १९८२, पृ.क्र. ९६.

४३. आर.के. क्षिरसागर, भारतीय रिपब्लिकन पक्ष, पी.एस. चिक्कलठाणकर, नाथ प्रकाशन, औरंगाबाद, १९७९, पृ.क्र. २६.

४४. प्रबुध्द भारत, डॉ. आंबेडकर महापरिनिर्वाण विशेषांक, संपा. बाळासाहेब आंबेडकर, बुध्दभुषण प्रिंटिंग प्रेस, मुंबई, पृ.क्र. ५१.

४५. संपादक शरणकुमार लिंबाळे, भारतीय रिपब्लिकन पक्ष, प्रकाशक नंदिनी गवळी, कोल्हापूर, १९९२, पृ.क्र. २५९.

४६. संपादक शरणकुमार लिंबाळे, भारतीय रिपब्लिकन पक्ष प्रकाशक नंदिनी गवळी, कोल्हापूर, १९९२, पृ.क्र. ५९.

४७. धनंजय किर, डॉ. बाबासाहेब आंबेडकर चरित्र, प्रकाशन, मुंबई, १९८०, पृ.क्र. ४०.

४८. आर.के. क्षिरसागर, भारतीय रिपब्लिकन पक्ष, पी.एस. चिक्कलठाणकर, नाथ प्रकाशन, औरंगाबाद, १९७९, पृ.क्र. ४१.

.......